दा.क्र. 3392

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा. क्र. ३३९२

IRBK-0103392
IRBK-0103392

वा० क्र०
३३९२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २८८८८
विभाग का. वा.
क्रमांक १०५७
नों. दि. ३१३१६९
वाचनालय शाखा.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ३३९२ नों दि ........
वि. कादं. वा. ........

IRBK-0103392
IRBK-0103392

# देशबंधु दास

सानें गुरुजी

राजे ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २८८८८
विभाग वा.वा.
क्रमांक १०८७
नों. दि. 3/9/3/49
वाचनालय शाखा

ஃ

किंमत १ रुपया

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

# दोन शब्द

सेवादल चरित्रमालेंतील देशबंधु चित्तरंजन दास यांचें हें चरित्र दुसरें पुष्प होय. १९२५ मध्यें देशबंधु मरण पावले. त्यानंतर सहा महिने मी त्यांचें एक चरित्र लिहित होतों. तें बृहत् चरित्र अद्याप तसेंच माझ्या ट्रंकेंत पडून आहे. १७।१८ वर्षें तीं ५।६ शें पानें प्रकाशाची वाट पहात आहेत. तीं पानें हें चरित्र लिहितांना मजजवळ नाहींत. त्यांतील कांहीं प्रसंग व गोष्टी डोळ्यासमोर आहेत. एक गुजराथी चरित्र येथें मला मिळालें होतें. त्याचीं कांहीं पानें फाटलीं होतीं. कोण लेखक तेंहि कळेना. परंतु सुंदर आहे तें चरित्र. सुंदर भाषेंत लिहिलेलें. हें चरित्र लिहितांना त्याचाहि मीं उपयोग केला आहे. त्या चरित्रकारांचा मी ऋणी आहें. या पुस्तकाची नवी आवृत्ति काढण्याचा सुयोग आला व माझें हस्तलिखित बाड जर हातीं आलें तर या चरित्रांत आणखी कांहीं गोष्टी व प्रसंग घालीन. तोंवर हें चरित्र सेवादलांतील बंधुभगिनींनीं गोड करून घ्यावें व देशबंधूंची उत्कटता, कळकळ व निस्सीम त्यागमय देशभक्ति आपल्या जीवनांत आणण्यासाठीं मनःपूर्वक प्रयत्न करावेत.

—साने गुरुजी

द्वितीय संस्करण १९५०

सर्वाधिकार प्रकाशकाचे आधीन

मुद्रक व प्रकाशक—दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. ( टिळक )
व्यवस्थापक चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव, पुणें २

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि. 3913129

# देशबंधु दास

मुंबईतील एका भव्य चाळीच्या मोठ्या गच्चीवर सेवादलाचीं मुलें बसलीं होतीं. रात्रीची वेळ होती. मुलें जेवून खाऊन आलीं होतीं. गच्चीवरून समुद्र दिसत होता. त्याच्या लाटा कानांवर येत होत्या. जवळची नारळीचीं झाडें वाऱ्यानें डोलत होतीं. मी आल्याबरोबर मुलें वाटोळीं बसलीं.

" आज कोणाच्या सांगतां पुण्यकथा ? " एकानें विचारलें.

" आज त्या प्रांतांतील एका थोर देशभक्ताच्या कथा सांगणार आहें, ज्या प्रांतांत प्रचंड नद्या आहेत; वंदे मातरम् गीत ज्या प्रांतांत जन्मलें व हिंदुस्थानभर गेलें; सुजलां, सुफलां, सस्यशामलां हीं विशेषणें ज्या प्रांताला विशेषेंकरून लावतां येतील; ज्या प्रांतानें जगांतील महान् कवि दिला, जगांतील थोर शास्त्रज्ञ दिला, जगांतील थोर योगी दिला; ज्या प्रांतानें भारतमातेसाठीं अपरंपार बलिदान केलें; अशा प्रांतातील थोर देशभक्ताच्या गोड व हृदयंगम गोष्टी सांगणार आहे. त्यागाच्या व वैभवाच्या कथा सांगणार आहें. कोणता बरें हा प्रांत, ओळखा. "

" बंगाल, बंगाल, " मुलें एकदम म्हणालीं.

" होय. बरोबर ओळखलेंत. ऐका तर आतां. गोष्टी संपेपर्यंत कंटाळूं नका. "

" त्या दिवशीं विनोबाजींच्या गोष्टी ऐकतांना आम्ही कंटाळलों का ? वेळ कसा गेला तें समजलेंसुद्धां नाहीं. तुम्हीच बोलून दमाल. आम्ही रात्रभरसुद्धां बसूं. "

" आतां करतो हं आरंभ. "

**विक्रमपूर परगणा**

पूर्व बंगालमध्यें विक्रमपूर नांवाचा परगणा आहे. गंगेचा एक फांटा व ब्रह्मपुत्रा यांची बनलेली विशाल पद्मा नदी तिच्या तीरावर हा परगणा आहे. पद्मेला सर्वनाशा असेंहि नांव आहे. पद्मेला अपार पूर यावा व गांवेंच्या गांवें वाहून जावीं. पद्मेच्या कांठीं किती संस्कृति फुलल्या व नाश पावल्या. पद्मेनें किती राज्यें उभारलीं व पाडलीं. पद्मा नदीनें स्वतःच्या हातानें अनंत इतिहास लिहिला व स्वतःच पुसूनहि टाकला. अंधार व प्रकाश यांचा खेळ पद्मा खेळत आली आहे. पद्मेचा प्रवाह फारच विशाल. पूर येतो तेव्हां तिचें पात्र आठ आठ मैल सुद्धां रुंद होतें. रवीन्द्रनाथ या पद्मेच्या प्रवाहावर कित्येक महिने गलबतांत बसूनच राहिले होते. गीतांजलींतील कांहीं अमर गीतें या पद्मेच्या संगीतांत जन्मलेलीं आहेत.

विक्रमपूर पूर्व बंगालचें जणुं हृदय. येथें कला फुलल्या. व्यापार वाढला. ज्ञान नांदलें. येथले व्यापारी दूर सिंहलद्वीप, सुमात्रा, अरबस्तान सर्वत्र जात. प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनस्यँग याचा

गुरु पंडित शीलभद्र त्याची येथेंच जन्मभूमि. तुम्ही गोपीचंदाचीं गाणीं ऐकलीं आहेत ना? बोलपट पाहिला असेल. तो गोपीचंद याच प्रांतांतला.

## तेलीर बाग

अशा या इतिहासप्रसिद्ध परगण्यांत तेलीरबाग म्हणून एक गांव आहे. चित्तरंजन दास—देशबंधु दास—यांचे पूर्वज या गांवांत रहात होते. देशबंधूंचे पणजोबा रतनकृष्ण दास हे अति उदार म्हणून प्रसिद्ध होते. औदार्याचा गुण हा वंशपरंपरा जणुं आला आहे.

## आजोबांच्या गोष्टी

देशबंधूंचे आजोबा जगद्बंधु. खरोखरच ते जगाचे बंधु होते. ते राजशाही येथें सरकारी वकील होते. त्यांनीं पुष्कळ पैसा मिळविला. परंतु दोन्ही हातांनीं तो खर्च केला. दरिद्री आप्त, शेजारी-पाजारी, सर्वांना ते देत. ते नाहीं कधीं म्हणत नसत. त्यांच्या औदार्याची कीर्ति सर्व विक्रमपूर परगण्यांत पसरली होती. त्यांनीं आपल्या जन्मग्रामीं एक अतिथिशाळा चालविली होती. कोणाहि पांथस्थाची तेथें राहण्याची, जेवण्याची मोफत व्यवस्था होत असे. तेथील नोकरचाकर नीट वागतात कीं नाहीं हें पाहण्यासाठीं एके दिवशीं जगद्बंधु नावेंत बसून निघाले. ते आपल्या गांवीं येऊन पोंचले. तों मध्यरात्र होत आली होती. सर्वांची निजण्याची वेळ. थकलेले नोकरचाकर आरामाच्या तयारींत होते. तों जगद्बंधु आले.

" एका अतिथीला जागा देतां का ? उपाशी आहें. जेवणाची सोय करतां का ? " त्यांनीं विचारलें.

" अशा मध्यरात्रीं यायला कांहीं वाटत नाहीं ? सकाळीं ये जा. " तेथील नोकर म्हणाला.

जगद्‌बंधु रागावले. त्यांनीं आपलें खरें स्वरूप प्रगट केलें. नोकर घाबरले. पायां पडूं लागले. क्षमामूर्ति जगद्‌बंधु म्हणाले, " असें करीत जाऊं नका. कोणी केव्हांहि येवो, त्यांचें स्वागत करा. तो देवच आला आहे असें समजा. "

आणि एकदां जगद्‌बंधु पालखींत बसून कोणत्या तरी गांवीं जात होते. वाटेंत एक वृद्ध ब्राह्मण त्यांनीं पाहिला. तो अनवाणी होता. मोठ्या कष्टानें जात होता. जगद्‌बंधूहि वृद्ध झाले होते. अशक्त होते. परंतु त्या ब्राह्मणाचे कष्ट त्यांना पहावत ना. त्यांचें हृदय विरघळलें. पालखींतून ते खालीं उतरले. त्या ब्राह्मणाला त्यांनीं पालखींत बसविलें. आणि स्वतः तीनचार मैल पायीं चालत गेले.

आणि जगद्‌बंधु कवीहि होते. धार्मिक विषयांवर ते कविता लिहीत. त्यांची सत्यनारायणाची कथा अद्याप घरोघर वाचली जाते. ते रसिक होते व रसिकांचे आश्रयदाते होते. अनेक साहित्यिकांना ते साहाय्य करीत.

**आईबाप**

देशबंधूंच्या पित्याचें नांव भुवनमोहन. ते कलकत्त्यांतील एक सुप्रसिद्ध ॲटर्नी होते. ॲटर्नी म्हणजे दुसऱ्याचीं सर्व कायदेशीर कामें चालवणारा—त्यांचा प्रतिनिधि होऊन सारें बघणारा—वकील.

भुवनमोहनहि अति उदार होते. त्यांच्या उदारपणास सीमा नव्हती. जें जवळ असेल तें देत. निर्भय व सत्यप्रेमी ते होते. देशाविषयींहि त्यांना फार प्रेम वाटे. हिंदुधर्मांतील रूढींचा त्यांना राग येई. श्रेष्ठ-कनिष्ठपणाचा तिटकारा वाटे. हिंदुधर्माचें उज्ज्वल स्वरूप निर्माण करूं पाहणाऱ्या ब्राह्मसमाजाचे ते सभासद झाले.

परंतु देशबंधूंची आई जुन्या वैष्णवपंथाचीच होती. वैष्णवधर्माची ती गोड गाणीं गाई. निर्गुण निराकार परब्रह्माची उपासना तिला मानवेना. भक्तिप्रेमाचा, देवाजवळ रुसण्यारागवण्याचा गोड वैष्णव-धर्म, भागवतधर्म तिला आवडे. देशबंधूंची आई फारच क्षमाशील होती. तिचें हृदय अति कोमल होतें. कोणाचेंहि दुःख तिला पाहवत नसे. तिचे डोळे दुसऱ्याविषयींच्या करुणेनें सदैव भरलेले असत. आणि दुसऱ्याचें दुःख दूर करूनच ते हसत. त्यांच्या घरांत एक दूरचा नातलग रहात होता. तो फुकट जेवे. एवढेंच नाहीं तर दारू पिऊन येई. दारूच्या निशेंत देशबंधूंच्या आईला तो शिव्या देई. भुवनमोहनांना एके दिवशीं या गोष्टीचा राग आला.

" याला हांकलून देतों. नको आपल्या घरांत. " ते म्हणाले.

" परंतु बिचारा जाईल कोठें ? उपाशी मरेल. राहूं दे. त्यांचें बोलणें मला थोडेंच लागतें आहे. आणि शुद्धीवर आले म्हणजे त्यांनाहि जरा वाईट वाटतें. राहूं दे. नका घालवूं. " ती माउली म्हणाली.

### जन्म

अशा कुटुंबांत देशबंधु जन्मले. ज्या कुळांत औदार्य, दया, क्षमा इत्यादि गुण पिढ्यान्‌पिढ्या संचित होत आले होते अशा थोर कुळांत देशबंधु जन्मले. रडणाऱ्यांबरोबर रडणारे, दुःखितांना पाहून दुःखी होणारे, अशांच्या पवित्रपावन कुळांत देशबंधु जन्मले. १८७० च्या नोव्हेंबर महिन्याच्या पांचव्या तारखेस देशबंधूंचा जन्म झाला. त्या वेळेस कलकत्त्यांतील भवानीपूर भागांत त्यांचे वडील रहात असत. देशबंधूंचें नांव चित्तरंजन असें होतें.

### लहानपणचें भविष्य

रवींद्रनाथांचेंहि घराणें कलकत्त्यास होतें. एकदां लहान चित्तरंजनास घेऊन त्याची आत्या रवींद्रनाथांच्या घरीं गेली होती. तेथें बायका गोष्टी बोलत बसल्या होत्या. तेथली एक वृद्ध आजी चित्तरंजनाची तेजस्वी बालमूर्ति पाहून म्हणाली, "हा मुलगा पुढें कोणी तरी मोठा पुरुष होईल." आणि त्यांची जी पत्रिका करण्यांत आली तिच्यांत हा मुलगा पुढें संन्यासी होईल असें होतें.

### विद्यार्थी-दशा

१८८६ मध्यें प्रवेशपरीक्षा पास होऊन ते प्रेसिडेन्सी कॉलेजांत गेले. त्यांची वक्तृत्वकला लहानपणापासून दिसून येऊं लागली. शाळेंत असल्यापासूनच ते सभोंवतीं मुलें जमवायचे. चर्चा करावयाचे. वाद करावयाचे. त्यांचे गुरुजन म्हणत, "हा पुढें मोठा वक्ता होईल."

**सर्वांचे आवडते**

मुलें त्यांच्याकडे ओढलीं जात. त्यांचा स्वभाव खेळकर व आनंदी होता. ते असत तेथें नेहमीं गडबड असायची, गप्पा असायच्या. एका विद्यार्थ्याला चित्तरंजनाचे मित्र व्हावें असें फार वाटत होतें. परंतु तो लाजाळू होता, संकोची होता. तो चित्तरंजनांकडे बघत दूर उभा असे. चित्तरंजनांचा हात हातांत घ्यावा असें त्याला वाटे. परंतु धैर्य होत नसे. एके दिवशीं चित्तरंजनांच्या घ्यानांत ही गोष्ट आली.

" तुम्ही असे दुःखी कां असतां ? दूर दूर एकटे कां उभे राहतां ? तुम्हांला का कोणी मित्र नाहीं ? " चित्तरंजनांनीं विचारलें.

'तुम्ही माझे मित्र व्हा. तुमच्या जवळ बोलावें असें किती दिवस वाटतें आहे. "

" मग कां बोललेंत नाहीं ? वेडे. चला माझ्याबरोबर. " असें म्हणून चित्तरंजनांनीं त्या विद्यार्थ्यांचा हात धरला व त्याला नेलें. ते दोघे परम मित्र बनले.

**विलायतेस प्रयाण**

१८९० मध्यें ते पदवीधर झाले. सन्मानानें उत्तीर्ण व्हायला थोडे मार्क कमी पडले. चित्तरंजन जरा खट्टू झाले. परंतु पित्यानें त्यांना इंग्लंडमध्यें पाठवायचें ठरविलें. आय्. सी. एस्. होण्यासाठीं ते निघाले. घरीं गरिबी येत होती. औदार्यामुळें दारिद्र्य येत होतें. पित्याला वाटे कीं मुलगा आय् सी. एस्. होऊन आला तर दारिद्र्य

जाईल, कटकट मिटेल. म्हणून कर्ज काढून त्यांनीं मुलाला विलायतेंत पाठविण्याचें ठरविलें. चित्तरंजन सहा हजार मैलांवर जावयास निघाला.

## दुःखी आई

चित्तरंजनांच्या आईस दुःख होत होतें. मुलगा परमुलखांत दूर जाणार याचें वाईट वाटत होतें. चित्तरंजन आईचे सर्वांत आवडते. चित्तरंजन जरी दूर गेला तरी त्यांना हुरहुर वाटे. आणि आतां तर सातासमुद्रापलीकडे हा लाडका पुत्र जाणार !

" आई, रडूं नको. " चित्तरंजन म्हणाले.

" दर आठवड्यास पत्र पाठवशील ना ? " तिनें विचारलें.

" होय. कधींहि चुकणार नाहीं. तुझा आशीर्वाद मला तारील. तूं काळजी नको करूं. "

आणि चित्तरंजन आय्. सी. एस्. होण्यासाठीं गेले.

## पार्लमेंट सभासदाचा निषेध

चित्तरंजन इंग्लंडांत गेले. अभ्यासांत रमले. परीक्षा झाली. परंतु त्याच वेळेस महर्षि दादाभाई नौरोजी इंग्लंडमध्यें पार्लमेंटांत निवडून येण्यासाठीं उभे राहिले होते. एक हिंदी मनुष्य पार्लमेंटांत प्रतिनिधि म्हणून जाऊं पहात होता. चित्तरंजन दादाभाईसाठीं प्रचार करूं लागले. त्यांचें वक्तृत्व देशसेवेस धावून आलें. देश-सेवेचा तो पहिला धडा. दादाभाई निवडून आले. याच सुमारास पार्लमेंटच्या एका सभासदानें हिंदी जनतेविषयीं कांहीं अपमानास्पद

उद्गार काढले होते. या सभासदाचें नांव मॅक्लिन साहेब. तो काय म्हणाला होता ? " हिंदु मुसलमान हे आमचे गुलाम आहेत. आम्ही त्यांना तरवारीनें जिंकून घेतलें आहे " इत्यादि उद्दाम भाषा त्या साहेबानें वापरली होती. हे शब्द ऐकून कोण दुःखी झाला ? कोणाचें हृदय पेटलें ? चित्तरंजनांचें चित्त संतप्त झालें. त्यांनीं हिंदी लोकांची सभा भरविली. त्या सभेंत अत्यन्त तेजस्वी असें त्यांनीं भाषण केलें. मॅक्लिनसाहेबाचा त्यांनीं निषेध केला. उदारमतवादी ग्लॅडस्टन या वेळेस अद्याप जिवंत होते. ओल्डहॅम येथें एक प्रचंड सभा झाली व उदारमतवादी लोकांनीं मॅक्लिनचा धिक्कार केला. ग्लॅडस्टनसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या एका सभेंत चित्तरंजनांचें उत्कृष्ट भाषण झालें. ते म्हणाले, " इंग्रजांनीं आम्हांला पाशवी बळानें जिंकलेलें नाहीं. तुम्हीं तरवारीनें नाहीं जिंकलेंत. आम्ही आपसांत भांडत होतों. आमच्यांत ऐक्य नव्हतें. शिस्त व संघटना नव्हती. तुमच्यामध्यें हे गुण होते. एकप्रकारें तो तुमचा नैतिक विजय होता. राष्ट्रीय सद्गुण तुमच्यांत अधिक होते. आमच्यांत त्यांची उणीव होती. परंतु या पार्लमेंटच्या सद्गृहस्थांना पाशवी बळाचा मोठेपणा वाटत आहे. हिंदी लोकांना आम्हीं तरवारीनें जिंकलें, तरवारीनें त्यांच्यावर राज्य करूं असें ते म्हणत आहेत. हिंदी लोक आमचे गुलाम असें म्हणत आहेत. असे शब्द ऐकून कोणता हिंदी मनुष्य संतापणार नाहीं ? राष्ट्रें कायमचीं कोणाचीं गुलाम रहात नसतात. इंग्लंड व हिंदुस्थान सहकार्यानें नाहीं का नांदणार ? "

अशा अर्थाचें चित्तरंजन बोलले. हे त्या काळांतील शब्द

आहेत, ज्या काळांत कॉंग्रेसचा आवाज सामर्थ्यवान् नव्हता, कॉंग्रेस जन्मून सातच वर्षे झालीं होतीं, ती बाल्यावस्थेंत होती. अशा काळांत इंग्लंडमध्यें हिंदी राष्ट्राची प्रतिष्ठा स्थापण्यासाठीं चित्तरंजन उभे राहिले. त्यांनीं केलेल्या भाषणांना तिकडील वर्तमानपत्रांतून प्रमुख स्थान देण्यांत आलें. कांहींनीं अग्रलेख लिहिले. आणि या चळवळीमुळें शेवटीं त्या मॅक्लिनसाहेबास माफी मागावी लागली. पार्लमेंटमधूनहि त्यांची हकालपट्टी झाली.

## देशभक्तींत पास; आय्. सी. एस्. मध्यें नापास

चित्तरंजनांनीं देशाची प्रतिष्ठा सांभाळली. साहेबाला हिंदी राष्ट्राची क्षमा मागायला लाविलें. परंतु आय्. सी. एस्च्या परीक्षेचें काय ? ब्रिटिश सरकारला चित्तरंजनांची ही तेजस्विता सहन झाली नाहीं. त्यांना नापास करण्यांत आलें. जे उमेदवार हवे असतात त्यांना पास करण्यांत येतें. नापास जे झाले, त्यांच्यांत चित्तरंजन पहिले होते. घरीं गरिबी वाढत होती. आईबाप आशेनें पहात होते. चित्तरंजनास काय वाटलें असेल ? परंतु ते डगमगणारे नव्हते. ते हसून म्हणत, " नापास झालेल्यांच्या यादींत तर मी पहिला आहें ना ? "

## बॅरिस्टर झाले

देशाचें भाग्य कीं चित्तरंजन आय्. सी. एस् झाले नाहींत. त्यांची सेवा भारतमातेस मिळावयाची होती, परकी सरकारला मिळावयाची नव्हती. ते आतां बॅरिस्टरीकडे वळले. पैशाची फार टंचाई असे. वरून वेळेवर पैसे येत ना. चित्तरंजन कसे तरी रहात होते. दोन

अनुक्रम ... विभाग ... क्रमांक ... वाचनालय

दोन, तीन तीन दिवस ते केवळ पाव व गरम पाणी यांवर रहात. कोठला चहा, कोठली कॉफी ? शेवटीं ते बॅरिस्टर झाले व मातृभूमीस यायला निघाले.

**गंमतीचा गंभीर परिणाम**

चित्तरंजन आईला प्रत्येक आठवड्यास पत्र पाठवीत असत. इंग्लंडहून निघतांना त्यांनीं आईला घरीं तार केली नाहीं. परंतु निघत आहें अशा अर्थाचें पत्र लिहून पोस्टांत टाकण्यासाठीं आपल्या मित्राजवळ त्यांनीं देऊन ठेवलें. परंतु मित्र तें टाकायला विसरला. घरीं पत्र गेलें असेल अशी देशबंधूंची कल्पना होती. ते मुंबईस उतरले. परंतु त्यांनीं घरीं तार किंवा पत्र पाठविलें नाहीं. घरीं एकदम जाऊन आईला चाकित करूं, गंमत होईल असें त्यांना वाटत होतें. ते मुंबईहून पाटण्यास आले. तेथें मित्राकडे राहिले. तेथें मित्राजवळ बोलतांना म्हणाले, " घरीं जाऊन एकदम चकित करीन. मी मुंबईस उतरलों. परंतु तार केली नाहीं. पत्र पाठविलें नाहीं. " शेवटीं त्या मित्रानें चित्तरंजनांच्या घरीं तार केली कीं चित्तरंजन आला आहे. परंतु घरीं आई ध्यास घेऊन बसली होती. दर आठवड्यास चित्तरंजनचें पत्र यावयाचें. परंतु ना पत्र, ना तार. त्या प्रेमळ मातेनें अन्नपाणी वर्ज्य केलें. ती अंथरुणास खिळली. जेव्हां त्या मित्राची तार आली तेव्हां आईला धीर आला. आणि चित्तरंजन घरीं आले. एकदम आईजवळ गेले. दोघांचीं हृदयें उचंबळलीं. आपण गंमत करणार होतों, आईला चकित करणार होतों, तो सारा आनंद पार कोठल्या कोठें गेला. आईची कृश मूर्ति पाहून चित्तरंजन फार दुःखी झाले. त्यांनीं आईची क्षमा मागितली.

## वकिलीस सुरुवात

चित्तरंजन १८९३ मध्यें विलायतेंतून कलकत्त्यास आले. आणि त्यांनीं वकिली सुरू केली. घरीं सारी ददात होती. वडील, लोकांचें कर्ज फेडून स्वत: कर्जबाजारी झाले होते. भुवनमोहन एका मित्राला चाळीस हजारांचे जामीन राहिले होते. पुढें ही जामीनकी सारी त्यांना भरावी लागली. कोठून आणायचे पैसे ? ते स्वत: कर्जाच्या समुद्रांत बुडाले. कोण तारणार, कोण वर काढणार ? चित्तरंजनांच्या मनांत आलें कीं वकिली करून एके दिवशीं हें सर्व कर्ज फेडूं.

## नादारींत नांव

भुवनमोहनबाबूंनीं एके दिवशीं स्वत:चें नांव दिवाळखोरींत नोंदविलें. अत:पर कर्ज देतां येत नाहीं असें पित्यानें खालीं मान घालून जाहीर केलें. परंतु पित्याच्या अपमानांत पुत्रहि भागीदार झाला. स्वत:चेंहि नांव दिवाळखोरांच्या यादींत सामील करण्याची चित्तरंजनांस जरूर नव्हती. परंतु पित्याची अप्रतिष्ठा होत असतां त्यांना स्वत:च्या प्रतिष्ठेची पर्वा वाटत नव्हती. तेहि दुनियेसमोर एक दिवाळखोर म्हणून उभे राहिले.

## चौफेर निराशा

बडे बडे वकील त्यांच्याकडे तुच्छ दृष्टीनें पहात. त्यांना फारसें काम मिळेना. ते कलकत्ता सोडून इतर जिल्ह्यांच्या ठिकाणींहि थोडें-फार काम मिळालें तर जात. जें कांहीं थोडेंफार काम मिळे त्यांत ते संपूर्णपणें लक्ष घालीत. परंतु एकंदरींत या वेळेस चोहों बाजूंस अंधार होता. श्रीमंतींत वाढलेली आई. ती आतां घरचें सारें काम

करी. चित्तरंजनांजवळ कधीं कधीं ट्रॅमच्या तिकिटासाहि पैसे नसत. ते पायीं कोर्टांत जात. या अशा निराशेंत त्यांच्या हृदयांतील परमेश्वर कांहीं दिवस दूर झाला. हृदयांत खूप खळबळ होती. अपार भावना उसळत होत्या. त्यांना कोठें प्रकट करणार ?

## काव्यनिर्मित

या भावना काव्यांत प्रकट होऊं लागल्या. आणि त्यांच्या भावगीतांचा पहिला संग्रह प्रसिद्ध झाला. त्याचें नांव ' मालंच. ' या पुष्पहारांत सुंदर भावनोत्कट गीतें आहेत. ईश्वरावरची श्रद्धा व अश्रद्धा-या दोहोंचें दर्शन यांत आहे.

" तें पहा सुंदर स्वप्न. तो पहा प्रभु. तो हळुहळु येत आहे. तालबद्ध पावलें टाकीत, फुलें फुलवीत येंत आहे. आनंद फेकीत येत आहे. स्मितांची वृष्टि करीत येत आहे. पृथ्वीवरचें सौंदर्य त्याचेंच. ह्या वसंत ऋतूंतील सौंदर्य त्याचेंच. "

असें चित्तरंजन सृष्टींतील सौंदर्य पाहून म्हणतात. सर्वत्र प्रभूची मूर्ति, त्याचें सौंदर्य पाहतात. परंतु हा भाव टिकत नाहीं. ते मग म्हणतात, " देव, देव; कोठें आहे देव ? त्याला सत्य समजून मीं पूजा केली. परंतु कोठें आहे तो ? ईश्वर, ईश्वर म्हणून मी हांका मारल्या. परंतु देवाच्या नांवानें हांका मारून रडणें वेडेपणा आहे. हा ईश्वर सर्वत्र वणवा पेटवून राहिला आहे. आमची सर्व सुखशांति मातींत मिळवीत आहे. आमच्या निराधारतेचें दुःख पदोपदीं वाढवीत आहे. "

आणि दुसऱ्या एका गीतांत म्हणतात:

"अरे धर्ममार्तंडा, तूं मात्र उच्च व बाकीचे तुच्छ का रे? कोठल्या शून्यांतून हा तुझा देव तूं निर्माण केलास? कशाला हीं त्याचीं गाणीं तूं गात आहेस? कशाला ही आरती? तुझे भाऊ तिकडे दुःखानें रडत आहेत, तेथें तूं कां नाहीं जात? एक देवता निर्मून आकाशाकडे तोंड करून पूजा करीत बसला आहेस, त्या देवळांतच तुझें जीवनपुष्प फुकट जाईल, सुकून जाईल."

या मालंचांत अशीं सुंदर गीतें आहेत. येथें देव नसला तरी मानवांविषयींची अपार सहानुभूति आहे. पतितांबद्दल प्रेम आहे. दुःखितांविषयीं करुणा आहे. दुसऱ्याचें दुःख दूर करण्यासाठीं ते स्वतःचें दुःख विसरूं पाहतात. ते एका गीतांत म्हणतात:

"दुसऱ्यांच्या दुःखाची आग तूं विझविली पाहिजेस. तूं स्वतःचें दुःख विसर. त्यावर हास्याचा, आनंदाचा पडदा घाल; तूं स्वतःच्या वासना नष्ट करून स्वतःचें जीवन-सर्वस्व दुसऱ्यांचे अश्रु पुसण्यासाठीं देऊन टाक. या जगांत जन्मून आपल्या डोळयांतील प्रेमळ किरणांनीं एखाद्याच्याहि जीवनाची कळी जर तुला फुलवितां आली नाहीं, एखाद्याचीहि वेदना जर तुला शांत करतां आली नाहीं, तर तुझ्या जीवनाचा काय उपयोग? जें जीवन केवळ स्वतःसाठीं असतें तें व्यर्थ असतें; जें जीवन विश्वासाठीं असतें तें कृतार्थ होतें."

या कवितेंत देशबंधूंचें सारें तत्त्वज्ञान आहे. त्यांनीं जगालाच सारें दिलें. स्वतःला पुढें शून्य केलें.

**सागर–संगीत**

मालंचानंतर 'माला,' 'सागरसंगीत,' 'किशोर-किशोरी,' 'अन्तर्यामी,' अशीं सुंदर सुंदर काव्यें त्यांनीं लिहिलीं. माला काव्य-संग्रहांत प्रेमाच्या सुंदर कविता आहेत. परंतु त्यांचें सर्वांत प्रसिद्ध काव्य म्हणजे सागरसंगीत. जणुं स्वत:च्या हृदयांतीलच अनंत भावनांचें संगीत ते ऐकत होते. ते वकील झाले होते. परंतु त्यांचें हृदय वकिलीसाठीं नव्हतें. कुटुंबाची प्रतिष्ठा पैसे मिळवून वाढवता यावी म्हणून ते वकील झाले होते. परंतु त्यांचें अंतरंग अन्यत्र होतें. स्वत:च्या मनांतलि थोर थोर भावना वकिलीच्या धंद्याखालीं त्यांनीं दडपून ठेवल्या होत्या. एखादी सुंदर शिक्षण–संस्था काढावी, ज्ञानप्रसार करावा, साहित्यसेवा करावी असें त्यांच्या मनांत येई. परंतु या सर्व ऊर्मि, या भावनांच्या लाटा त्यांनीं दडपून ठेवल्या होत्या. कुटुंबासाठीं त्यांनीं आपल्या आंतरिक आशा–आकांक्षांचें जणुं बलिदान केलें. त्यांचें वकील होणें म्हणजे अपरंपार त्याग होता. चित्तरंजनांनीं पुढें अपार त्याग केला. पैसे दिले. स्वत:चें घर दिलें. परंतु कुटुंबाच्या प्रतिष्ठापनेसाठीं त्यांनीं इतर भावना गुंडाळून वकिली हातीं घेतली. या गोष्टींतील त्याग, हा मूक त्याग सर्वांत अधिक थोर होय.

चित्तरंजन सकाळीं उठत व सागरतीरीं जाऊन बसत. कल-कत्त्यास समुद्र जवळ नाहीं. हुगळी नदी हा गंगेचा फांटा किंवा गंगेला मिळालेली नदी आहे. तिलाच गंगा म्हणतात. तिलाच सागर म्हणतात. समुद्राच्या भरतीचें पाणी येतेंच. चित्तरंजन तेथें

बसत. सूर्योदय होत असावा. आकाशांत रंग पसरावा व खालीं सागरतरंग नाचत असावेत. वारे वहात असावेत व सागर—लीला सुरू असावी. तेथें सागराचें कधीं शांत रूप दिसे, कधीं उग्र. कधीं चित्तरंजनांना तो सागर एखाद्या प्रेमी राजकुमाराप्रमाणें वाटे, तर कधीं त्रिशूळधारी रुद्राप्रमाणें भासे. हृदयांतील सारे भाव त्या सागर—संगीतांत ते ऐकत होते.

त्यांच्या हृदयतंत्रीला सागराचा स्पर्श होई आणि संगीत स्रवूं लागे. समुद्र आपल्या लहरींच्या अंगुलींनीं चित्तरंजनांची हृदयवीणा जणुं वाजवी. सागरसंगीतांत महान् निसर्गपूजा आहे. अति सुंदर भाषा आहे. सृष्टींत जणुं ते बुडाले आहेत.

ते सागराला विचारतात, “ या प्रभातकाळीं तूं काय म्हणतो आहेस, काय गातो आहेस ? तुझें गीत सर्वत्र भरून राहिलें आहे. काय त्याचा अर्थ ? तूं क्षणांत कोमल स्वर काढतोस, क्षणांत मेघ-गंभीर काढतोस; क्षणांत तुझा सूर ऐकून डोळ्यांत अश्रु येतात, तर दुसऱ्याच क्षणीं मी उन्मत्त होऊन जणुं वेडा बनतो. तुझे हे सूर ऐकून अंगावर रोमांच उभे राहतात. या अनंत तानांवर मी डोलत राहतों व समोरच्या प्रभातवेळेकडे शांतपणें पाहात राहतों.”

चित्तरंजन स्वतःच्या हृदयांतील का सूर ऐकत होते ? घरची करुण स्थिति पाहून का अश्रु येत होते ? देशाची स्थिति पाहून का पुन्हां उन्मत्त होऊं पाहात होते ? काय होतें हें सारें ? सागर-संगीतांत चित्तरंजनांचा हृदयासिंधु आहे. त्यांच्या हृदयाला भूक

होती. कशाची ? देशसेवेची ? स्वातंत्र्याची ? विश्वप्रेमाची ? ती भूक शांत होईपर्यंत का हृदयसागर गर्जत राहणार होता ?

**असे क्षण आम्ही क्वचितच अनुभवले !**

१९११ मधील गोष्ट आहे. एके दिवशीं चित्तरंजनांकडे त्यांचे मित्र जमले होते. थंडीचे दिवस होते. आणि चित्तरंजनांनीं सागर-संगीत पुस्तक मागवून घेतलें. त्यांनीं त्यांतील कविता म्हणून दाखविल्या. श्रोत्यांची जणुं समाधि लागली. ते मित्र म्हणाले “ असे क्षण आम्हीं क्वचितच कधीं अनुभवले असतील. ”

**सागरसंगीतांत तो आहे**

आणि पुढें चित्तरंजनांची आई जेव्हां अत्यवस्थ होती तेव्हां चित्तरंजन मुंबईला गेलेले होते. मुलगा केव्हां भेटेल असें मातेला झालें होतें. ती पुत्रासाठीं तळमळत होती. शेवटीं ती माता म्हणाली, “ त्याचें सागरसंगीत पुस्तक माझ्याजवळ आणून द्या. त्या पुस्तकांत तो आहे. ” आणि माता सागरसंगीत वक्ष:स्थलाशीं धरून देवाघरीं गेली. असें हें सागर–संगीत काव्य आहे. देश-बंधूंची ती वाङ्मयी मूर्ति आहे.

**अन्तर्यामी**

अन्तर्यामी या काव्यांत चित्तरंजनांची श्रद्धा पुन्हां जागृत झाली आहे. ईश्वरी प्रेमाचा पुन्हां उदय झाला आहे. हृदयांत पुन्हां दीप लागला आहे. पुन्हां फुलें फुललीं आहेत. ते म्हणतात:

“ वाजवा, विजयाचा डंका वाजवा. आज भय नाहीं. संकोच

नाहीं. शंका नाहीं. शेवटीं आशेचा विजय झाला. श्रद्धा व अश्रद्धा यांच्या झटापटींत श्रद्धा विजयी झाली. माझ्या गळ्यांत किती हे विजयहार ! माझे पंचप्राण या विजयानें, या वैभवानें थरथरत आहेत. हृदयांत पहा ही फुलबाग पुन्हां फुलत आहे. आज दुःख सुखमय झालें, सुख दुःखमय झालें. सुखदुःख एकरूप झालें. कोणत्या गीताच्या गर्वानें माझें हृदय भरून आलें आहे ? ''

असा अन्तर्यामी पुन्हां भेटला. मालंच व अन्तर्यामी या दोन काव्यसंग्रहांच्या मध्यंतरीं दहा वर्षे गेलीं. दहा वर्षे हृदयमन्थन चाललें होतें. दहा वर्षे आशा-निराशांचा झगडा चालला होता. शेवटीं आशेचा, श्रद्धेचा, प्रेमाचा विजय झाला.

## वासंतीदेवी

आणि १८९७ मध्यें, जीवनांत प्रकाश व अंधार यांचें युद्ध चालू असतांनाच त्यांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नीचें नांव वासंती-देवी. चित्तरंजनांच्या जीवननौकेचें सुकाणूं म्हणजे वासंतीदेवी. दासांच्या जीवनांत वासंतीदेवीमुळेंच संगीत आलें. प्रमाण राहिलें. चित्तरंजनांच्या जीवनाचा वासंतीदेवी म्हणजे मोठा आधार होता. चित्तरंजनांचा स्वभाव वासंतीदेवींना समजे तसा कधीं कोणाला समजला नाहीं.

## वंगभंगाची चळवळ

चित्तरंजन वकिलीच्या धंद्यांत धडपडत होते. अद्याप ते पुढें आले नव्हते. कुटुंबाची प्रतिष्ठा केव्हां पुन्हां नीट स्थापीन असें त्यांना झालें होतें. आणि ते वंगभंगाचे दिवस आले. व्हॉइसरॉय

कर्झन यानें बंगालचे दोन तुकडे केले. सारी बंगाली जनता खवळून उठली. परंतु सरकार लक्ष देईना. आणि १९०६ मध्यें कलकत्त्यास राष्ट्रीय सभा भरली. दादाभाई अध्यक्ष होते. सभेंत जहाल पक्ष व नेमस्त पक्ष यांची खडाजंगी झाली. लोकमान्य टिळक, विपिनचंद्रपाल, वगैरे पुढारी सभेंतून उठून गेले. त्यांच्याबरोबर चित्तरंजनाहि उठून गेले होते.

**दडपशाही**

राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार यांची चळवळ सुरू झाली. सारा बंगाल गर्जत होता. बंगालच्या राष्ट्रीय भावनांच्या या पुरास नीट वळण लावण्यासाठीं एक महापुरुष आला. बडोदें संस्थानांतील शिक्षणाधिकाऱ्याच्या जागेचा राजीनामा देऊन श्री. अरविन्द घोष हे बंगालला निघून आले. एका राष्ट्रीय महाविद्यालयाचे ते प्रमुख झाले. त्यांनीं 'वंदेमातरम्' पत्र सुरू केलें. अत्यंत भावनामय व तेजस्वी विचार वंदेमातरम् देऊं लागलें. कांहीं तरुण दहशतवादाकडे वळले. सभांनीं हें सरकार ऐकत नसेल तर बाँब फेकूं या असें तरुण म्हणूं लागले. आणि पहिला बाँब फेकला गेला. १९०८ च्या एप्रिल महिन्याची ३० तारीख होती. त्या दिवशीं हा पहिला स्फोट झाला. आणि मेच्या पहिल्याच तारखेस तो सोळा वर्षांचा तेजस्वी तरुण खुदीराम बोस पकडला गेला. आणि मेच्या दुसऱ्या तारखेस अरविन्द, त्यांचे बंधु बारीन्द्र, उल्हासकर दत्त इत्यादि अनेक देशभक्तांना अटक झाली. सर्वत्र धरपकड होत होती. मधून मधून बाँब उडत होते. पिस्तुलें झाडलीं जात होतीं.

## अरविंदांचा बचाव

कलकत्त्यांतील कांहीं लोकांनीं या तरुणांच्या बचावासाठीं कांहीं फंड गोळा केला. कांहीं वकिलांचीं नांवें जाहीर झालीं. हे वकील या तरुणांचा खटला चालविणार होते. या वकिलांच्या यादींत चित्तरंजनांचें नांव नव्हतें. परंतु पुढें पैसे संपत आले, आणि हे भाडोत्री वकील अळंटळं करूं लागले. अरविंदासारख्यांना कोण वांचवणार ? कोण पुढें येणार ? कोण त्यांची बाजू मांडणार ?

## अलिपूर बाँबकेस

आलिपूर बाँबकेस म्हणून हा खटला प्रसिद्ध आहे. अरविंद व इतर तरुण कैदेंत होते. अरविंद ईश्वरध्यानांत रमले. तुरुंगांत श्रीकृष्णाचें दर्शन त्यांना होऊं लागलें. परंतु अशा अवलियाला कोण वांचवणार ? अरविंदांच्या बहिणीनें एक पत्र प्रसिद्ध केलें. सर्व राष्ट्रापुढें तिनें हात पसरले होते. ती भगिनी लिहिते :—

“ माझा भाऊ निर्दोष आहे. परंतु जवळ पैसा नाहीं. पैसा मिळाला तर वकील देतां येईल. बचाव करतां येईल. माझा भाऊ वांचेल. मी सर्व राष्ट्रापुढें हात पसरीत आहे. ”

चित्तरंजन तें पत्र वाचून हळहळले, कळवळले. परंतु दुसऱ्या वकिलांच्या हातांतील कामांत ते कशी ढवळाढवळ करणार ? ते रोज आपल्या मित्रांजवळ म्हणत, “ हे माझ्याकडे कां नाहीं खटला घेऊन येत ? हा खटला मीच चालवूं शकेन. अरविंदांना मीच वाचवूं शकेन. अरविंदांचा आत्मा ! त्या आत्म्याची ओळख मलाच आहे. त्या थोर आत्म्याची इतरांस ओळख होणें अशक्य आहे. ”

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. ........... नों. दि. ............
वि. ............... क्र. ..........


## चित्तरंजनांकडे खटला आला

शेवटीं तो खटला चित्तरंजनांकडे आला. त्यांना अत्यंत आनंद झाला. ते म्हणाले, " एक दिवस हें काम माझ्याकडे येईल अशी मला खात्री होती. मी का अरविंदांचा कोणी नाहीं ? ते का माझे भाऊ नाहींत ? " आणि असें म्हणून ते खटल्याच्या कामांत पडले. हा खटला एक वर्षाहून अधिक काळ चालला होता. चित्तरंजनांच्या समोर रात्रंदिवस हें खटल्याचें काम असें. रात्रीं दोन दोन वाजेपर्यंत ते कागदपत्रें पहात बसत. घरांत अडचण असे. इतर कामें या काळांत त्यांनीं घेतलीं नाहींत. कर्ज काढून घरखर्च चालविण्यांत येई. घरची गाडी घोडा सारें विकलें गेलें. आणि तें शेवटचें त्यांचें भाषण ! आठ दिवस भाषण करीत होते. आणि समारोप करतांना म्हणाले, " न्यायाधीशमहाराज ! अरविंद निर्दोषी आहेत. एक काळ असा येईल कीं, ज्या वेळेस राजकीय झगड्यांची धूळ शांत झालेली असेल. निःपक्षपाती दृष्टीनें त्या वेळेस पाहतां येईल आणि अरविंदांचा महान् आत्मा जग ओळखील. अरविंदांचा आवाज साता समुद्रांपलीकडेहि जाईल. एक थोर प्रेषित, एक ईश्वराचा दूत असें जग त्यांना संबोधील. सर्वत्र त्यांचा गौरव व जयजयकार होईल. "

चित्तरंजनांची ही भविष्यवाणी किती यथार्थ झाली आहे ! आणि न्यायाधीशांनीं निकाल दिला. अरविंद निर्दोषी ठरले. न्यायाधीश निकाल देतांना म्हणाले, " चित्तरंजनांनीं अति उत्कृष्टपणें काम केलें. चित्तरंजनांसारखा बचाव करणारा येथें नसता तर कदाचित

एका निर्दोष पुरुषास मला मरणाची शिक्षा द्यावी लागली असती. त्यापासून चित्तरंजनांनीं मला वांचाविलें."

## स्वाभिमानी चित्तरंजन

हा अलिपूर बाँब खटला चालवीत असतां एकदां न्यायाधीश "Non-sense" म्हणून उद्गारला. चित्तरंजनांचे डोळे लाल झाले. हा न्यायाधीशच उद्यां निकाल देणार. त्याच्याजवळ जपून वागलें पाहिजे. अपमान गिळला पाहिजे. असे विचार त्यांच्या मनांत आले नाहींत. ते एकदम म्हणाले, "या वेळेस तुम्हीं न्यायासनावर आहांत, ही दुःखाची गोष्ट आहे. दुसऱ्या स्थितींत असते तर योग्य उत्तर मीं दिलें असतें."

## संपत्तीच्या शिखरावर

अरविंदांच्या खटल्यांत चित्तरंजन दासांनीं अपरंपार मेहनत घेतली. ती निष्काम सेवा होती. परंतु पुढें अपरंपार फळ मिळालें. चित्तरंजनांची देशभर कीर्ति गेली. बंगालभर त्यांचा जयजयकार झाला. चित्तरंजनांचें अलौकिक व परिणामकारी वक्तृत्व, कायदेपटुत्व, उलट तपासणींतील कुशलता, परिश्रम, सर्व गोष्टी जनतेच्या नजरेस आल्या आणि मोठमोठे खटले आतां त्यांच्याकडे येऊं लागले. एकेका दिवसाला हजार, दोन हजार रुपये त्यांना मिळूं लागले. लक्ष्मी भराभरा येऊं लागली.

परंतु ते पैशाचे आषक नव्हते. देशसेवकांचे सारे खटले त्यांनीं विनामूल्य चालविले. बिपिनचंद्रपाल व ब्रह्मबांधव उपाध्याय यांचे खटले चालवीत असतां ज्यूरी रडली. इतकें परिणामकारक चित्त-

रंजनांचें भाषण झालें. बंगालभर ठिकठिकाणीं या खटल्यांसाठीं त्यांना जावें लागे. सर्व बंगाल या सेवेसाठीं त्यांचा ऋणी आहे.

**जुनें देणें दिलें**

आणि चित्तरंजनांनीं आतां एक चमत्कार केला. त्यांनीं स्वत:चेंहि नांव दिवाळखोरांच्या यादींत घातलें होतें. परंतु आतां संपत्ति आली होती. त्यांनीं पूर्वीच्या देण्याचा सारा हिशोब केला. आणि सर्व देणें देऊन टाकलें. न्यायमूर्ति फ्लेचर म्हणाले, "नादारींत नांव नोंदवल्यावर मागून सर्व ऋण फेडून टाकल्याचें हें पहिलेंच उदाहरण."

**कुटुंबाची प्रतिष्ठा वाढली**

चित्तरंजनांच्या या कृतीमुळें सारा बंगाल चकित झाला. त्यांच्या कुळाची, कुटुंबाची प्रतिष्ठा वाढली. चित्तरंजनांची कीर्ति सर्वत्र पसरली. आतां सुखाचे, भाग्याचे दिवस होते. घरांत आनंद होता.

**मायबापांचें निधन**

आणि वडील भुवनमोहन आजारी पडले. आईहि आजारी पडली. आईचें हें शेवटचें आजारीपण. चित्तरंजन मुंबईला कामासाठीं गेले होते. आई अत्यवस्थ आहे असें कळतांच ते लगेच परतले. परंतु वाटेंतच त्यांना स्वप्न पडलें. आईचा आत्मा उडून जात आहे असें त्यांनीं पाहिलें. ते घरीं आले तों आई निघून गेली होती. चित्तरंजनांचें सागरसंगीत वक्ष:स्थळाशीं धरून ती देवाघरीं निघून गेली होती. आई गेली. आणि पुढें सहा महिन्यांनीं वडीलहि मरण पावले. त्यांनीं दानधर्म केला. गरिबांना अन्नदान दिलें. भरपूर

मेवामिठाई वांटली. ते स्वत: हजर राहून सर्वांना पोटभर मिळते कां नाहीं तें पहात होते. ते स्वत: वाढीताहि होते.

## स्फूर्तिदात्री माता

आईवर त्यांचें अपार प्रेम होतें. माता त्यांची स्फूर्ति-देवता होती. रोज कोर्टांत जाण्याच्या आधीं ते आईच्या पायां पडून जात. आईच्या आशीर्वादावर त्यांची श्रद्धा होती. आईचें स्मरण येतांच त्यांचे डोळे भरून येत. मरतांना त्यांची आई म्हणाली, " जन्मोजन्मीं हाच पति मिळो; चित्तरंजनासारखा मुलगा मिळो. " या उद्गारावरून आईचें चित्तरंजनांवर किती प्रेम होतें त्याची कल्पना येईल.

## समाजसुधारक

चित्तरंजनांचे वडील ब्राह्मसमाजाचे सभासद होते. परंतु चित्त-रंजन वैष्णवधर्मीच होते. वैष्णवधर्मी असूनाहि ते समाजसुधारक होते. चित्तरंजनांवर ब्राह्मपंथीयांचाहि राग व सनातनी वैष्णवधर्मीयांचाहि राग, रूढी वगैरे ते मानीत नसत. त्यांनीं आपल्या मुलींचे मिश्र-विवाह केले होते. मोठी मुलगी अपर्णादेवी. सुधीरचंद्र रॉय नांवाच्या एका तरुणावर तिचें प्रेम होतें. परंतु सुधीरचंद्राचे वडील परवानगी देत ना. तीन वर्षें चित्तरंजनांनीं वाट पाहिली. शेवटीं सुधीरचे वडील विरघळले. एका मुलीच्या लग्नांत भटजीसाहि बोलवायचें नाहीं असें त्यांचें म्हणणें होतें. परंतु वासंतीदेवी सांगत होत्या " भटजी वगैरे बोलवा. सुधारणा हळुहळू करा. एकदम सर्वांचीं मनें दुखवूं नका. " चित्तरंजन गच्चींत फेऱ्या घालीत होते. शेवटीं पत्नीच्या सांगण्याप्रमाणें त्यांनीं केलें. हुंडा वगैरे घेण्याच्या ते विरुद्ध होते.

बंगाली कन्या स्नेहलता हिनें हुंड्यापायीं स्वतःला जाळून घेतलें होतें. वरविक्रयाची ही रूढी पाहून चित्तरंजन संतापत, दुःखी होत. ते एकदां म्हणाले:

"आपली अनंत निद्रा अद्याप जात नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. अनेक स्नेहलता भस्म होत आहेत, तरी आईबाप जागे होत नाहींत. मुलींचीं हुंड्यामुळें लग्नें होत नसतील तर त्यांना शिकवा. स्वतःची जीवनयात्रा चालविण्यास त्यांना समर्थ करा. त्या समाजोपयोगी कामें करतील. जीवन कृतार्थ करतील."

**भावा-बहिणींवर अपार प्रेम**

चित्तरंजनांचें आपल्या बहीणभावांवर फार प्रेम होतें. त्यांनीं त्यांचें शिक्षण केलें. एक भाऊ प्रफुल्लरंजन हे पुढें हायकोर्टाचे जज्ज झाले होते. सर्वांत लहान भाऊ वसंतरंजन हाहि बॅरिस्टर होऊन आला होता. कलकत्त्यास तो बॅरिस्टरी सुरू करणार इतक्यांत तो आजारी पडला. दार्जिलिंग येथें तो अल्पवयांत मरण पावला. चित्तरंजनांस फार दुःख झालें. त्यांना तीन बहिणी. सर्वांत मोठी बहीण विधवा होती. ती व तिचीं मुलें चित्तरंजनांजवळ असत. दुसरी एक बहीण उर्मिलादेवी. तीहि गतधवा झाली. तिनें पुढें राष्ट्रसेवेस वाहून घेतलें. मुलींची राष्ट्रीय शाळा ती चालवी. तिसरी बहीण अमलादेवी. अमलादेवीचा कंठ अति गोड होता. १९१७ मध्यें कलकत्त्यास काँग्रेस भरली. त्या वेळेस अमलादेवीनें वंदे मातरम् गीत म्हटलें होतें. पुरुलिया येथें तिनें एक अनाथाश्रम चालविला होता. आंधळे, लुळे, सर्वांना तेथें आश्रय मिळे. चौथी एक बहीण लहानपणींच वारली.

चित्तरंजनांना मुलगा एकच. त्याचें नांव चित्तरंजन.

असा हा संसार चालला होता. कसली ददात नव्हती. आनंद होता.

## सुखी पतिपत्नी

आणि वासंतीदेवींचें चित्तरंजनावर अपार प्रेम. वाईट दिवस गेले होते. चिंता संपली होती. पतीच्या आवडीनावडी जणुं त्या स्वत:च्या मानीत. वासंतीदेवी प्रेमानें चित्तरंजनांना "चित्त" अशी हांक मारीत. "चित्त, आज कोणत्या रंगाचें लुगडें नेसूं?" त्या विचारीत आणि चित्तरंजन सांगतील त्या रंगाचें त्या नेसत. त्यांच्या अन्योन्य प्रेमाला सीमा नव्हती.

## हृदयांतील खरी भूक

परंतु चित्तरंजन जरी ह्या बाह्यवैभवांत होते, तरी त्यांच्या हृदयाची भूक दुसरीच होती. हृदयसागर आणखी कशासाठीं तरी गर्जत होता. दुसरें कोणी तरी त्यांना हांक मारीत होतें. कोण हांक मारीत होतें? बंगालमध्यें चैतन्य म्हणून अति थोर संत होऊन गेले. चैतन्य म्हणजे मूर्तिमंत प्रेम. निळा समुद्र पाहून हा माझा घननीळ कृष्णच नाचत आहे असें त्यांना वाटे व बाहु उभारून ते समुद्रांत घुसूं बघत. दारुड्यांनीं मारून रक्तबंबाळ केलें तरी चैतन्य म्हणायचें, त्यांनीं मला मारलें तरी मी त्यांना प्रेमच देणार. चैतन्य महाप्रभु म्हणजे बंगालमधील वैष्णवधर्माचा प्राण. चैतन्यांना गौरांग असेंहि नांव आहे. चित्तरंजन म्हणायचे, "बंगालला जाणायचें असेल तर चैतन्यांना जाणलेंच पाहिजे."

बंगाली लोकांची भावनोत्कटता चैतन्यांचें चरित्र वाचूं तर थोडी-फार समजेल. चित्तरंजन चैतन्यांच्या चरित्रांत डुंबत. चण्डीदासाचीं अति गोड अशीं भक्तिमय गीतें त्यांत रमत. चैतन्यांचे जीवन व चण्डीदासाचीं गीतें यांतून मला नवप्रेरणा मिळाली, नवचैतन्य मिळालें असें चित्तरंजन म्हणत.

ते कथाकीर्तनास जावयाचे. हरिसंकीर्तन करावयाचें. एकदां श्रीरामकृष्णांची समाधि असलेल्या बेलूर मठांत ते गेले होते. श्रीराम-कृष्ण परमहंसांची पुण्यतिथि होती. कीर्तनाचा गजर चालला होता. चित्तरंजन तेथें रमले होते. परंतु दुसरीकडे खूप गर्दी होती. कशाची ? तेथें प्रसाद वांटण्यांत येत होता. चित्तरंजन तेथें आले. तेथें हिंदु होते, मुसलमान होते, अमेरिकन मिशनरीहि होते. जातिवर्णविरहित, धर्मभेदरहित असा तो प्रेममय मेळावा पाहून चित्तरंजनांचें हृदय उचंबळलें.

## हें तीर्थस्थान सोडून घरीं का खाऊं ?

त्यांनीं प्रसादासाठीं हात पुढें केला. स्वामी प्रेमानंद म्हणाले, “ तुम्ही जेथें उतरलां आहांत तेथें प्रसाद पाठवला आहे. येथें गर्दी आहे. ” चित्तरंजन भावभक्तीनें म्हणाले, “ येथेंच सर्वांबरोबर मला खाऊं दे. हें तीर्थस्थान सोडून घरीं का खात बसूं ? ”

## सारी प्रभूची लीला आहे

चित्तरंजन वैष्णवधर्मांतील प्रेममय भक्तीच्या द्वारा अद्वैताकडे वळले. सर्वत्र तो माझा प्रभु आहे असें ते म्हणत. वाऱ्याच्या सळ-सळण्यांत, वृक्षपर्णांच्या मर्मरध्वनींत, पांखरांच्या गोड कलरवांत,

पुष्पांच्या सुगंधांत, सूर्यचंद्रतारकादींच्या तेजांत, निळ्या निळ्या सुंदर पर्वतश्रेणींत, सदैव वाहणाऱ्या सरितांत, उचंबळणाऱ्या सागर-संगीतांत सर्वत्र त्या प्रभूचीच अनंत लीला आहे. हर्षशोकांत तोच. आशानिराशा त्याचाच खेळ. एकाच परमतत्त्वाची सर्व-व्यापी छाया सर्वत्र आहे असें ते म्हणत. मला कोणी एखादा सद्गुरु भेटेल का, महापुरुष भेटेल का कीं जो मला चैतन्यांची सर्व धर्मसाधना नीट देईल. अशी त्यांना तळमळ होती. त्यांचें एक मित्र कामिनीचंद्र त्यांना म्हणाले, " चित्तरंजन, देवासाठीं सर्व सोडून द्यावें लागेल. तुम्हांला संन्यासी व्हावें लागेल. "

चित्तरंजन म्हणाले, " माझ्या पत्रिकेंत संन्यासयोग आहेच. "

### नारायण मासिक

वैष्णवधर्मातील सत्कल्पनांच्या प्रसारार्थ त्यांनीं नारायण मासिक काढलें. मनांतील देशविषयक व देवविषयक भावना या मासिकांतून ते प्रकट करूं लागले. जें पुढें कृतींत यावयाचें होतें तें शब्दांत उतरूं लागलें. साहित्याचीहि गंभीर चर्चा ते करीत. त्यांची माता मरण पावली होती. मातेची जागा वंगमाता घेत होती. बंगालवर त्यांचें किती प्रेम ! देश म्हणजेच देव. त्या अद्वैताचाच अनुभव ते वंगमातेच्या पूजेंत घेत. त्या मासिकांत एकदां त्यांनीं लिहिलें:

" बंगालचें पाणी व बंगालची धूळ यांत एक प्रकारचें अमर सत्य लपलेलें आहे. हेंच सत्य निरनिराळ्या युगांत निरनिराळ्या स्वरूपांत प्रकट होत असतें. साहित्य, तत्त्वज्ञान, काव्य, युद्ध, पूर,

धर्म, कर्म, अज्ञान, अधर्म, स्वातंत्र्य, पारतंत्र्य, जय, पराजय, वैभव, विपत्ति, सर्वांतून हेंच सत्य प्रकट होत असतें. वाऱ्यानें डोलणारीं बंगालमधील हिरवींगार भाताचीं शेतें, मोहोरानें बहरलेल्या आमराया, सायंकाळीं मंदिरांतून होणाऱ्या धूपदीपारती, ते शंखध्वनि व ते घंटांचे नाद, खेड्यांतील चित्रांत रेखल्याप्रमाणें असणाऱ्या झोंपड्या व झोंपड्यासमोरचीं स्वच्छ अंगणें, बंगालमधील नद्या, सरोवरें, तळीं, वापी; पूजेच्या फुलांच्या फुलबागा; बंगालचें आकाश; बंगालचा वारा; बंगालचें तुळशीपत्र; बंगालचें गंगाजळ; आणि सागर ज्याचे पाय धूत आहेत असें तें जगन्नाथाचें मंदिर; बंगालचा सागरसंगम, त्रिवेणीसंगम; काशी, मथुरा, वृंदावन आणि बंगालचा समस्त इतिहास; या सर्वांतून तें सनातन सत्यच लपलेलें असतें. या सर्वांच्या द्वारां तें सनातन सत्यच नाचत असतें, प्रकाशत असतें."

चित्तरंजनांनीं या उताऱ्यांत पश्चिमेकडे मथुरा वृंदावनापर्यंत व इकडे जगन्नाथपुरीपर्यंत बंगालची व्याप्ति केली आहे. या सर्व प्रदेशांत चैतन्य नाचले, हिंडले. विक्रमपूरची सत्ता काशीपर्यंत होती. म्हणून त्या सर्वांचा अंतर्भाव.

या नारायण मासिकांत साहित्यविषयक अत्यंत मार्मिक टीकालेख चित्तरंजनांनीं लिहिले. चित्तरंजन कवि होतेच. परंतु ते खोल व सहृदय टीका करूं शकतात ही गोष्टाहे दिसून आली. साहित्यिक लोकांत त्यांना मान मिळूं लागला. १९१५ मध्यें बांकीपूर येथें बंगाली परिषद भरली होती. त्या परिषदेंतील साहित्यविभागाचे ते

अध्यक्ष होते. आणि पुढच्या वर्षी डाका येथें भरलेल्या साहित्य-परिषदेचे ते स्वागताध्यक्ष होते.

## कवि गोविंददास

आणि तेथलीच कवि गोविंददास यांची ती गोष्ट आहे. गोविंददास हे अत्यन्त गरीब होते. ते त्या साहित्यसंमेलनास आले होते. परंतु त्यांना आंत प्रवेश मिळेना. त्यांना कोण ओळखणार ? स्वागत-सभासद व्हावयास त्यांच्याजवळ पैसे कोठें होते ? गोविंददासांचीं राष्ट्रीय गीतें बंगालभर पसरलीं होतीं. परंतु हेच ते गोविंददास असें कोणाला माहीत नव्हतें. त्यांच्या एका गाण्यांत पुढील भाव होता.

"तूं स्वदेश स्वदेश म्हणून म्हणतोस. परंतु हा देश तुझा नाहीं. हा देश तुझा नाहीं. हा देश तुझा असता, ही गंगा व ही यमुना जर तुझी असती, तर परक्यांच्या मालानें भरलेलीं, परकी सैन्यानें भरलेलीं गलबतें या नद्यांतून वावरलीं असतीं का ? कशाला म्हणतोस हा स्वदेश माझा ? हा देश तुझा नाहीं राहिला." असा हा जनतेचा कवि होता. दरिद्री कवि होता. चित्तरंजनांच्या कानांवर गोष्ट गेली. ते धांवत आले. दरिद्री कविरायाला त्यांनीं हृदयाशीं धरिलें. त्यांना सन्मान्य स्थानीं नेऊन बसविलें. कवि गोविंददास यांचें हृदय या प्रेमानें भरून आलें. त्यांनीं चित्तरंजनदासांना पुढें एक अत्यन्त प्रेमळ, करुण-गंभीर व भावनोत्कट पत्र लिहिलें. या गोविंददासांनीं आपल्या एका कवितेंत म्हटलें आहे.

" आज तुम्ही मला ओळखीत नाहीं. परंतु उद्यां माझ्या समाधीवर तुम्ही फुलें उधळाल."

परंतु मरणाच्या आधींच चित्तरंजनांनीं त्यांना ओळखलें, त्यांचा सन्मान केला.

**वृन्दावनांत जाऊं**

चित्तरंजनांचा आत्मा दैवी प्रेमाकडे जायला आंतून अधीर होत होता. तें बाह्य वैभव, ते विलास यांत त्यांचा आत्मा नव्हता. ते सर्वांना देत होतेच. वंगभंगानंतर जें प्रचंड आंदोलन झालें, जे क्रांतिवीर झाले, त्यांत अनेकांवर आपात्ति आल्या. किती फांशीं गेले. किती काळ्या पाण्यावर गेले. कित्येकांच्या घरीं अडचणी होत्या. जे पुढें तुरुंगांतून सुटून आले त्यांना कोठें आधार नव्हता. परंतु या सर्वांना चित्तरंजनांचा एक मात्र आधार होता. सहस्र हातांनीं हा उदारात्मा सर्वांना देत होता. विद्यार्थ्यांना देत होता. दरिद्री साहित्यिकांना देत होता. अनाथ व अगतिक देशभक्तांना देत होता. बिपिनचंद्रपाल यांचा सर्व खर्च चित्तरंजनच चालवीत. असा हा शतमुखी त्याग सुरूच होता. परंतु त्यांचा आत्मा सर्वस्व-त्यागाची हांक ऐकत होता. ते वासन्तीदेवीस म्हणायचे, "आतां सर्व सोडून वृंदावनांत जाऊं. तेथें कृष्णाचें दर्शन घेऊं. गोपींनीं प्रेमाचे पूर जेथें वाहवले त्या यमुनेच्या तीरीं लोळूं. तेथें गीतें आळवूं, अश्रु ढाळूं."

**वृंदवनाऐवजीं भारतमातेची हांक**

परंतु प्रभूची निराळीच योजना होती. त्या वेळेस १९१४ चें

महायुद्ध सुरू होतें. लोकमान्य टिळक सुटले होते. त्यांनीं पुन्हां कॉंग्रेसमध्यें प्रवेश केला होता. लोकमान्य येईपर्यंत जहाल पक्षाचे लोक कॉंग्रेसपासून दूर होते. त्यांना कॉंग्रेसमध्यें कोण घेणार ? दारें जणूं बंद होतीं. परंतु लोकमान्यांनीं दूर दृष्टीनें थोडें पडतें घेऊन, मिळतें घेऊन, कॉंग्रेसमध्यें शिरकाव करून घेतला. आणि राष्ट्रीय पक्षाची ते पुन्हां नीट संघटना करूं लागले. ठिकठिकाणचीं आजपर्यंत स्वस्थ असणारीं माणसें—त्यांना ते पुन्हां ओढूं लागले. राजकारणांत खेचूं लागले. लोकमान्य व डॉ. ॲनी बेझंट यांनीं स्वराज्याची चळवळ सर्वत्र सुरू केली. लोकमान्यांनीं दौरे सुरू केले. परंतु ॲनी बेझंट बाईस अटक झाली. देशभर अटकेचा निषेध झाला. कलकत्त्यास १९१७ जुलैच्या १७ तारखेस प्रचंड सभा भरली. चित्तरंजनांचें तेजस्वी भाषण झालें. सरकारचा निषेध करण्यांत आला.

महायुद्धाच्या या काळांत स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न झाले. गदर चळवळ झाली. अनेक फांशीं गेले. आणि बंगालभर धरपकड सुरू झाली. त्या वेळच्या मॉडर्न रिव्ह्यूनें लिहिलें, "बंगालमध्यें असें एकहि घर नसेल, ज्यांतील एखाद्या तरी तरुणास अटक झालेली नाहीं." पत्नींचे पति, बहिणींचे भाऊ, मातांचे पुत्र तुरुंगांत होते. त्यांची ना चौकशी ना कांहीं. तरुण असणें हाच फक्त गुन्हा. ज्या ठिकाणीं स्थानबद्ध करून ठेवीत, त्या जागा वाईट असत. कधीं तेथें सापाहि असत. जमीन उखळायची. अधिकारी येऊन म्हणायचें "येथें कां कसरत करतां ? अद्याप मस्ती जिरली नाहीं ?" कोणी आजारी पडत. कोणी क्षयी होत. या तरुणांची कोण बाजू घेणार ?

अनुक्रम २८८८८
विभाग आ/वा.
क्रमांक ३२००८०
नों. दि. ३/१३/६९

चित्तरंजनच त्यांच्यासाठीं उभे होते. १९१७ च्या आक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या तारखेस कलकत्त्यास या अटकबंद तरुणांविषयीं प्रचंड सभा झाली. चित्तरंजनांचें हृदयास घरें पाडणारें भाषण झालें आणि शेवटीं ते म्हणाले:

"ज्या घरांत कोणास अटक नाहीं असें एखादेंच घर पूर्व बंगालमध्यें असेल. सुधारणा देणार, सुधारणा देणार असा एकीकडे डांगोरा पिटीत असतां इकडे ही सर्रहा अटक करणें हा का शहाणपणा आहे ? सरकारचें हें करणें अन्याय्य आहे, अयोग्य आहे."

चित्तरंजन अशा रीतीनें पुन्हां देशाकडे ओढले जाऊं लागले. आणि १९१७ सालीं तर कलकत्त्यासच कॉंग्रेस भरली. देशांत पुन्हां उत्साह संचरत होता. लोकमान्य आले. चित्तरंजनांना त्यांनीं संपूर्णपणें राजकारणांत पडण्याचा प्रेमपूर्वक आग्रह केला. आणि १९१८ मध्यें मुंबईस कॉंग्रेसचें जादा अधिवेशन भरलें तेव्हां चित्तरंजन पुण्यास आले. लोकमान्यांकडे पाहुणे म्हणून उतरले. त्यांचें भाषण झालें. लोकमान्य म्हणाले, "एक दिवस लौकरच असा येईल कीं ज्या दिवशीं चित्तरंजन संपूर्णपणें देशसेवेस वाहून घेतील."

## रौलेट बिल

बंगालभर विनाचौकशी शेंकडों तरुण कोंडवाड्यांतून ठेवलेले होते. या तरुणांवर आरोप तरी कोणते ? कोणता पुरावा ? सरकारनें एक कमिटी नेमली. त्या कमिटीचे रौलेट साहेब अध्यक्ष होते. या

कमिटीनें सर्व चौकशी केली. क्रान्तिकारकांची संघटना कशी आहे, त्यांचे प्रयत्न कसे चालतात तें सर्व मांडलें. आणि कांहीं उपाय सुचविले. हे तरुण हिंदुस्थानसरकारच्या वटहुकुमांनीं अटकेंत होते. परंतु महायुद्ध थांबलें. आतां या वटहुकुमांची काय जरूर? परंतु हे चळवळे तर दडपून ठेवतां आले पाहिजेत. प्रांतिक सरकारांना अधिक सत्ता या बाबतींत द्यावी, पोलिसांना संशयावरून वाटेल त्याला अटक करतां यावी, अशा प्रकारचे उपाय या कमिटीनें सुचविले. सरकार कांहीं तरी असा कायदा करणार असें जाहीर झालें. रौलेट बिल हिंदुस्थान सरकार पास करणार असें नक्की झालें.

**महात्मा गांधी उभे राहिले**

कॉंग्रेसचें शिष्टमंडळ विलायतेंत गेलें होतें. लोकमान्य विलायतेंत होते. आणि इकडे मानवी स्वातंत्र्यास काळिमा फांसणारें बिल पास होत होतें. दहा बारा लाख हिंदी शिपायी महायुद्धांत मेले. अब्जावधि रुपये हिंदुस्थाननें दिले. बक्षीस काय? तर हा रौलेट कायदा. हा असह्य अपमान होता. ही कृतघ्नता होती. आणि साबरमतीच्या आश्रमांतील सिंह बाहेर आला. हें बिल पास करूं नका. नाहींतर मी सत्याग्रह करीन, असें नम्रपणें महात्माजींनीं व्हाइसरॉयांना कळविलें. परंतु सरकारनें १९१९ च्या मार्चमध्यें बिल पास केलें. आफ्रिकेंत सत्याग्रहाचें युद्ध लढणाऱ्या महावीराची परीक्षा हिंदी सरकारला अद्याप व्हायची होती. चंपारण्यांतील लढा, खेडा जिल्ह्यांतील लढा महात्माजी लढले होते. परंतु आतां अखिल भारतीय लढा होता.

## प्रार्थनेचा व उपवासाचा दिवस

मार्च महिन्यांतील तो शेवटचा रविवार होता. त्या दिवशीं सर्व हिंदुस्थानभर सभा भरायच्या होत्या. प्रार्थना करायची, उपवास करायचा, कायदा मागें घ्या अशी सरकारला विनंति करायची, असा हा कार्यक्रम महात्माजींनीं दिला. आणि हिंदुस्थानभर एक नवीन चैतन्य उसळलें.

## कलकत्त्यांतील सभा

कलकत्त्यांत प्रचंड सभा झाली. चित्तरंजनांचें भाषण झालें. ते म्हणाले:

"आज महात्मा गांधींनीं नेमलेला दिवस. आंतरिक वेदना प्रकट करण्याचा हा दिवस आहे. भरभराटीचे दिवस असतात तेव्हां आपणांस स्वतःचें भान नसतें. विपत्कालींच आपण नीट डोळे उघडतों. आत्मसंशोधन करतों. ईश्वराचा संदेश ऐकूं येतो. हिंदी राष्ट्राच्या इतिहासांत आज आणीबाणीची वेळ आहे. प्रत्येकाच्या आत्म्याची कसोटी आहे. तुमचा आत्मा शक्तिसंपन्न होऊं दे. परंतु ही कोणती शक्ति? कोणतें बळ आपण मिळवायचें? पशुबळ, शस्त्रबळ हें आपलें बळ नाहीं. प्रेम हें आपलें बळ. महात्माजी हें प्रेमबळ देत आहेत. त्याचा पंथ दाखवीत आहेत. महात्माजींचा नव भारतास हा संदेश आहे. महात्माजींच्या संदेशांतील भावना तेव्हांच आपण आपलीशी करूं शकूं—जेव्हां स्वार्थ, द्वेष, ईर्षा, मत्सर यांचा आपण त्याग करूं. आपला रौलेट कायद्याला विरोध आहे. कां? तर हा कायदा पास झाला तर राष्ट्रीय जीवनाचा विकासच थांबेल.

राष्ट्राचा कोंडमारा होईल. ही महान् राष्ट्रीय आपत्ति आहे. ती येऊं नये म्हणून आपण उभे राहूं या. देशप्रेमानें उचंबळून उभे राहूं या. या देशप्रेमानें आपण त्याग करायला तयार राहूं या. आज राष्ट्राचें हृदय उडत आहे, प्रेमाचा विजय हा ठरलेलाच. कारण या प्रेमाच्या मुळाशीं प्रामाणिकपणा आहे."

## हत्याकांड

कलकत्त्यांतील सभा शांतपणें पार पडली. परंतु दिल्ली, पंजाबकडे कोणते प्रकार होत होते? १९१९ मार्चच्या ३० तारखेस दिल्लींत विराट सभा झाली. तेथें गोळीबार झाले. स्वामी श्रद्धानंद गुरख्यासमोर छाती उघडी करून "चलाव तेरी गोली" असें म्हणाले. हिंदुमुसलमानांचें रक्त सांडलें. हिंदूंच्या प्रेतांस मुसलमानांनीं खांदे दिले. मुसलमानांच्या हिंदूंनीं. माशिदींतून स्वामी श्रद्धानंदांनीं प्रवचनें दिलीं.

पंजाबांत ओड्वायर गव्हर्नर होता. त्यानें धरपकड सुरू केली. पंजाबला राष्ट्रीय विचारांचा वारा लागूं नये अशी त्याची इच्छा होती महायुद्धाच्या वेळेस रिक्रूटभरतीसाठीं पंजाबभर जुल्म झाले होते. लोकांना असंतोष होता. या असंतोषांत सत्याग्रहाची ठिणगी पडूं नये म्हणून पंजाबी सरकार जपत होतें. डॉ. किच्लू, डॉ.सत्यपाल वगैरेंस अटक झाली. महात्माजी मुंबईहून पंजाबकडे जायला निघाले. परंतु त्यांना वाटेंतच अटक करून पुन्हां मुंबईस आणून सोडण्यांत आलें. देशभर वार्ता अशी पसरली कीं, महात्माजींना अटक झाली. आणि देशभर वादळ झालें. अमदाबादला होळ्या पेटल्या. कलकत्ता

संतापले. पंजाबांत तेच प्रकार. अमृतसर येथें जालियनवाला बागेंत प्रचंड सभा भरली होती. सरकारचा निषेध करण्यासाठीं ही सभा होती. परंतु जनरल डायरनें सभेवर गोळीबार केले. गोळ्या संपेपर्यंत मारा केला. विमानेंहि आलीं. कांहीं ठिकाणीं बाँबफेंकहि झाली. आणि लष्करी कायदा सुरू केला. जालियनवाला बागेंत शेंकडों निरपराधी जीव मेले. स्त्रिया, पुरुष, मुलें यांची ती क्रूर कत्तल होती. आणि लोकांना रस्त्यांवरून फटके मारले. पोटावर सरपटत जायला लावलें. विद्यार्थ्यांना उन्हांतून अनेक मैल चालविलें. हिंदी राष्ट्राच्या विटंबनेस सीमा नव्हती. आणि या डायरची इंग्लंडमधील लॉर्डांच्या सभेंत पाठ थोपटण्यांत आली. त्याची नोकरी गेली म्हणून त्याच्यासाठीं फंड उभारण्यांत आले. याहून अपमान तो कोणता ?

## हंटर कमिटी व काँग्रेस चौकशीकमिटी

सरकारनें या हत्याकांडाची व एकंदर लष्करी कायद्याखालीं झालेल्या अत्याचाराची चौकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमली. हंटरसाहेब तिचे प्रमुख असल्यामुळें तिला हंटर कमिटी म्हणतात. काँग्रेसनेंहि चौकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमली त्या कमिटींत महात्मा गांधी होते. चित्तरंजनांचीहि तिच्यावर नेमणूक करण्यांत आली. त्यांची प्रकृति त्या वेळेस बरी नव्हती. तरीहि चार महिने या कमिटीचें काम त्यांनीं केलें. काँग्रेसनें भला मोठा अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल पुढें सरकारजमा करण्यांत आला. हंटरकमिटीनें सारी सारवासारवच केली.

**अमृतसरची कॉंग्रेस**

१९१९ सालची कॉंग्रेस अमृतसर येथेंच भरली. जेथें शेंकडोंचें बलिदान झालें, जें शहर अग्निदिव्यांतून गेलें तेथेंच सारे राष्ट्रसेवक जमा झाले. लष्करी कोर्टांनें ज्यांना वाटेल तशा शिक्षा फर्मावल्या होत्या, त्यांतील पुष्कळांची मुक्तता झाली. दुःखांत थोडें सुख आलें; आणि हिंदुस्थानला कोणत्या सुधारणा द्यायच्या त्याहि याच वेळेस जाहीर करण्यांत आल्या. अमृतसरला महात्मा गांधी, लोकमान्य, चित्तरंजन, डॉ. ॲनी बेझंट, पंडित मोतीलाल नेहरू अशी थोर थोर मंडळी होती. चर्चा चालल्या. सुधारणासंबंधींचा मुख्य ठराव या कॉंग्रेसमध्यें चित्तरंजनांनींच मांडला. लोकमान्यांनीं चित्तरंजनांकडे नेतृत्व दिलें. चित्तरंजन देशाच्या राजकारणांत पुढें येऊं लागले. ते हळुहळु अखिल हिंदुस्थानचे पुढारी होऊं लागले.

**कलकत्त्याची खास कॉंग्रेस**

देशांत अशांतता होती. पंजाबमधील अन्याय सरकारनें दूर केला नव्हता. रौलेट कायदा रद्द करण्यांत आला नव्हता. आणि महायुद्धांत तुर्कस्थानसाठीं म्हणून हिंदी मुसलमानांना दिलेलीं आभिवचनें तहाच्या वेळेस खुशाल मोडण्यांत आलीं होतीं. यामुळें सारे हिंदुमुसलमान एक झाले. महात्माजींनीं या सरकारवर संपूर्णपणें बहिष्कार घालावा असें राष्ट्राला सुचविलें. त्याचा विचार करण्यासाठीं म्हणून कलकत्त्यास कॉंग्रेसचें खास अधिवेशन करण्याचें ठरलें. याच वेळेस लोकमान्य देवाघरीं गेले. एक ऑगस्ट १९२० रोजीं लोकमान्यांनीं देह ठेवला. जणूं महात्माजींच्या हातीं राष्ट्र

देऊन ते गेले आणि पुढें ४ सप्टेंबरला लालाजींच्या अध्यक्षतेखालीं कलकत्त्यास जादा अधिवेशन झालें. महात्माजींचा संपूर्ण बहिष्काराचा ठराव मंजूर झाला. कोर्टावरील बहिष्कार व शाळा-कॉलेजांवरील बहिष्कार याला चित्तरंजनांचा विरोध होता. सरकार धरपकडी करतें. खटले भरतें. कोर्टें मोकळीं असावींत. तसेंच हजारों लहानमोठ्या विद्यार्थ्यांचें काय करावयाचें? परंतु सर्व राष्ट्राचा जेव्हां संप असतो तेव्हां या गोष्टीचा विचार करायचा नसतो. एक प्रचंड सामुदायिक प्रयोग होता. तो महान् राष्ट्रीय प्रयत्न होता. त्यांत सर्वांनीं सामील होणें जरूर होतें. आणि अशा वेळेस तरुणांना नाहीं हांक मारायची तर कोणाला?

**नागपूरची कॉंग्रेस**

कलकत्त्याच्या जादा अधिवेशनानंतर महात्माजी देशभर विजेसारखे हिंडू फिरूं लागले. त्यांचे लेख रामबाणाप्रमाणें हृदयांत घुसत होते. नव हिंदुस्थान निर्माण केला जात होता. निःशस्त्र जनतेला महात्माजी असहकाराचें अहिंसक शस्त्र देऊं पहात होते. राष्ट्राची मान उंच होणार होती. चित्तरंजन नागपूर येथें १९२० च्या डिसेंबरमध्यें भरणाऱ्या कॉंग्रेसला निघाले. महात्माजींच्या ठरावाला विरोध करण्यासाठीं म्हणून ते आले. बरोबर शेंकडों प्रतिनिधि ते घेऊन आले होते. परंतु काय चमत्कार. महात्माजींनीं चित्तरंजनांना जिंकून घेतलें. पंडित मोतीलाल नेहरू आधींच मिळाले होते. आणि आतां हा बंगालचा महान् नेताहि मिळाला. विरोध करायला आलेल्या चित्तरंजनांनींच कॉंग्रेसच्या खुल्या अधिवेशनांत महात्माजींचा तो असहकाराचा ठराव मांडला. जीवनांत क्रान्तीची वेळ आली.

## चित्तरंजन बोलतो तसा वागतो

आणि ठराव मांडून त्यावर चित्तरंजन बोलत होते. ती मेघ-गंभीर भावनोत्कट वाणी सुरू होती. परंतु सभेंतील कोणी एकानें विचारलें, "कोर्टावर बहिष्कार, वकिलांनीं वकिल्या सोडाव्या, परंतु तुमचें काय ?" विजेप्रमाणें एकदम चित्तरंजन भीष्मवाणी बोलले, "चित्तरंजन बोलतो तसा वागतो." त्या उदात्त व निश्चित शब्दांचा जादूसारखा परिणाम झाला. आणि दुसऱ्या दिवशींच चित्तरंजनांनीं वकिली सोडल्याचें वर्तमानपत्रांनीं सर्व जगाला कळविलें. सारें जग चकित झालें.

## बंगालभर प्रचार

पन्नास हजारांची महिन्याची मिळकत ! परंतु एका क्षणांत चित्तरंजनांनीं त्याचा त्याग केला. त्याग करणें त्यांना जड नसे जात. त्याग हा त्यांचा स्वभाव होता. त्या त्यागानें सारे दिपले. त्या त्यागानें राष्ट्राला स्फूर्ति दिली. भावनामय बंगालचे नवे तरुण चित्तरंजनांचा शब्द झेलण्यासाठीं उभे राहिले. महात्माजींनीं याच्या आधीं कलकत्त्याच्या एका विद्यार्थ्यांच्या सभेंत म्हटलें होतें, "तुम्ही चित्तरंजनांच्या नेतृत्वाची वाट पहात आहांत. त्यांचें नेतृत्व लौकरच तुम्हांला मिळेल. तो काळ दूर नाहीं. देशाची हांक येतांच सर्वस्वाचा त्याग करण्यासाठीं ते धांवून येतील, अशी मला अशा आहे." आणि ती आशा पुरी झाली.

**" पाडा हें विद्यापीठ "**

चित्तरंजन नागपुराहून आले आणि कलकत्त्यास विद्यार्थ्यांच्या प्रचंड सभा होऊं लागल्या. तेथील विद्यापीठासमोर चित्तरंजनांचें भाषण झालें.

" हें विद्यापीठ का तुम्हांला मोह पाडतें ? मोह झुगारा. हें विद्यापीठ देशासाठीं जाऊं नका असें म्हणत असेल तर या विद्यापीठाच्या इमारतीची एकेक वीट उखडून ती इमारत जमीनदोस्त करा. देशाचें स्वातंत्र्य हांक मारीत आहे. कधीं असे क्षण येतात कीं ज्या वेळेस सर्वांनीं त्याग करावयाचा असतो. सरकारी नोकरशाहीचें आसुरी तंत्र बंद पाडायचें आहे. या सरकारला कोणीहि सहकार देतां कामा नये. असहकाराचा मार्ग हा त्यागाचा आहे, क्लेशांचा आहे. तुम्ही तुमच्या भविष्यकाळावर पाणी सोडा. या नोकरशाहीला नष्ट करण्यासाठीं, स्वराज्य स्थापण्यासाठीं हा त्याग करा. स्वत:चें कर्तव्य स्वत:लाच न कळलें तर दुसऱ्याला आपण कशी जागृति देणार ? म्हणून उठा. जागे व्हा, जागे व्हा, जागे व्हा ! कर्तव्याचें स्मरण करा आणि स्वातंत्र्याच्या मार्गावर हिंमतीनें, दृढ निश्चयानें व निर्भयतेनें उभे रहा. "

असा सर्वत्र संदेश देत चित्तरंजन निघाले. परंतु मैमनसिंगच्या मॅजिस्ट्रेटानें तेथें येण्यास बंदी केली. तेथील विद्यार्थ्यांची, जनतेची निराशा झाली. चित्तरंजनांनीं पुढील तेजस्वी संदेश पाठविला.

" आपल्याच देशांत आपणांस पशूप्रमाणें समजण्यांत येतें. स्वराज्याशिवाय जीवन असह्य आहे. "

आणि दुसऱ्या एका गांवीं गेले. तेथें प्रचंड सभा. तेथें वजीद अली म्हणून मोठे जमीनदार होते. ते उदार होते. एक राष्ट्रीय शाळा त्यांनीं सुरू केली होती. त्यांच्याच खटपटीनें ती प्रचंड सभा भरली होती. चित्तरंजन गांवें व शहरें घेत पुढें सिल्हटला गेले. तेथें खिलाफत परिषदेचे ते अध्यक्ष होते. ते म्हणाले :

" नव्या युगाचा हा आरंभ आहे. सर्वांचें ऐक्य होत आहे. सर्व जातीजमातींच्या ऐक्याचा उषःकाल आहे. हें ऐक्य कायमचें राहिलें पाहिजे. स्वराज्याच्या सिद्धीसाठीं सारे एक व्हा. स्वराज्या-शिवाय तरणोपाय नाहीं. आपल्या स्वतःच्या घरांत आपणांस कोल्ह्याकुत्र्याप्रमाणें वागवण्यांत येत आहे. न्यायाचा पत्ता नाहीं. खायला अन्न नाहीं. अंगभर कपडा नाहीं. मुलाबाळांची आबाळ होत आहे. स्त्रियांचा अपमान होत आहे. कीडमुंगीप्रमाणें खुशाल आपले प्राण घेण्यांत येत आहेत. जालियनवाला बागा होत आहेत. ही सारी स्थिति बदलावयाची असेल तर स्वराज्य मिळविलें पाहिजे. केवळ हिंदूंनाच नाहीं, केवळ मुसलमानांनाच नाहीं तर सर्वांना या स्वराज्याची जरूर आहे. ज्याला ज्याला म्हणून प्रामाणिकपणें जगायचें आहे, माणसाप्रमाणें जगायचें आहे त्या सर्वांना जरूर आहे. "

## कोमिल्ल्याची मध्यरात्रीची सभा

आणि त्या दिवशीं रात्रीं चित्तरंजन कोमिल्ल्यास येणार होते. पूर्व बंगालमध्यें कोमिल्ला म्हणजे देशभक्तीचें आगर. उल्हासकर दत्त हा थोर क्रान्तिकारक कोमिल्ल्याचाच. कोमिल्ला शहरानें जितके देश-

भक्त दिले तितके क्वचितच एखाद्या शहरानें दिले असतील. दोन दिवसांनीं इंटरमीजिएटची परीक्षा सुरू व्हायची होती. ती बंद पडावी म्हणून चित्तरंजन येणार होतें. रात्रीं तुफान सभा भरली. परंतु चित्तरंजनांचा पत्ता नाहीं. ९ वाजले, १० वाजले, ११ वाजले आणि बारा वाजायची वेळ आली. सभा वाट पहात होती. आणि इतक्यांत चित्तरंजन आले. वंदे मातरंचा घोष शांत आकाशांत दुमदुमला. सर्वांचीं तोंडें फुललीं. चित्तरंजन थकले होते. परंतु तो उत्साह पाहून त्यांच्या भावना उचंबळून आल्या. ते उभे राहिले. आणि तेच तेच शब्द पुन्हां पुन्हां उच्चारीत.

"एवढ्या मध्यरात्रीं मी कां आलों ? बोला कां आलों ? कां आलों सांगा. मी का पागल आहें ? कां आलों माहीत आहे ?"

ते कां आलों, कां आलों शब्द श्रोत्यांच्या हृदयाचा जास्त ठाव घेत. त्या व्याख्यानाचा अपार परिणाम झाला. बहुतेक विद्यार्थ्यांनीं परीक्षेवर बहिष्कार घातला. बंगालमध्यें शेंकडों विद्यार्थ्यांनीं शाळा-कॉलेजें सोडलीं. एक प्रकारची स्फूर्ति सर्वत्र संचरली होती.

**नवे महान् संकल्प**

कॉंग्रेस कार्यकारिणी समिति १९२१ च्या एप्रिलमध्यें बेझवाडा येंथे भरली. आणि एक कोटि टिळक फंड, एक कोटि कॉंग्रेसचे सभासद, २० लाख चरखे सुरू करणें असा कार्यक्रम राष्ट्रास देण्यांत आला. पुढारी आपापल्या प्रांतांत रात्रंदिवस खटपट करूं लागले. क्षणाची विश्रांति नाहीं. चित्तरंजनांची वाणी बंगालला चेतवणी देत होती.

**कर्तव्यासाठीं प्राण हातीं घेऊन उभे**

कामाची अशी धुमश्चक्री सुरू असतांनाच आसाममधील चहाच्या मळ्यांतील मजुरांची केविलवाणी हांक चित्तरंजनाच्या कानावर आली. मजूर त्रस्त झाले होते. त्यांची कोणीच दाद घेईना. त्यांनीं संप केला. परंतु उपयोग नाहीं. शेवटीं हजारों मजूर आपल्या गांवांना परत जाण्यासाठीं निघाले. पोटांत अन्न नाहीं, अंगावर वस्त्र नाहीं अशा कंगाल कामगारांचे ते प्रस्थान होते. ते हजारों कामगार करीमगंज येथें आले. तेथील लोकांनीं त्यांना खायला प्यायला दिलें, परंतु रेल्वेचे अधिकारी तिकिटेंच देत ना. तिकीट दिलें नाहीं म्हणजे हे कामगार पुन्हां मळ्यांत कामावर जातील असें सरकारी अधिकाऱ्यांस वाटत होतें. नागरिकांनीं बॅ. सेनगुप्त यांना तार केली. सेनगुप्त रेल्वे अधिकाऱ्यांस भेटले. तिकिटें मिळालीं. हे कामगार चांदपूर येथें आले. परंतु तेथें त्यांची कोण व्यवस्था करणार ? तेथून बोटीनें जावयाचें ! कसें एकदम सारें होणार ? सरकारनें या भुकेकंगाल कामगारांची कांहीं व्यवस्था केली पाहिजे होती. बोटीनीं सारे जाईपर्यंत त्यांच्या राहण्याची, खाण्याची तजवीज केली पाहिजे होती. परंतु या कामगारांना, त्यांच्या स्त्रियांना, मुलांबाळांना भाकर देण्याऐवजीं गुरख्यांची पलटण त्यांच्या अंगावर सोडण्यांत आली. आणि या गुरख्यांनीं गोळीबार केले ! निर्दोष रक्त सांडलें गेलें. सारा बंगाल हळहळला. संतापला. चित्तरंजन चांदपूरला जायला निघाले. परंतु जायचें कसें ? रेल्वेच्या कामगारांनीं संप केला होता. रेल्वे चालू नव्हती. पद्मा नदींतून जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. परंतु पद्मेला

प्रचंड पूर आला होता. तिच्या प्रवाहांत नाव कोण टाकणार? पद्मा म्हणजे सर्वनाशी. हत्तीसारख्या लाटा उठत होत्या. वारा घों करीत होता. मित्र म्हणाले, “ चित्तरंजन, जीव धोक्यांत नका घालूं. ” चित्तरंजन म्हणाले, “ कर्तव्य करीत असतां मरण येणें याहून धन्यतर काय? शेवटीं ते निघाले. त्यांच्याबरोबर कोण होतें? कोणते मित्र होते? फक्त वासंतीदेवी बरोबर होत्या. पतीच्या पाठोपाठ सावित्रीप्रमाणें जाणारी ती थोर सती बरोबर होती. नाव निघाली. एकदां तर नाव गडप होणार असें वाटलें, परंतु स्वतःच्या जगण्याचा विचार त्यांच्या मनांत नव्हता. त्या गरिब कामगारांच्या लाचारीचा प्रश्न त्यांच्यासमोर होता. स्वतःची चिंता नव्हती. दुःखितांची चिंता होती. आणि शेवटीं ते सुखरूप आले. कामगारांना भेटले. प्रांतिक काँग्रेसच्या वतीनें ५ हजार रुपये त्यांनीं आधींच पाठविले होते. आतां समक्षच ते आले. बोटीची त्यांनीं व्यवस्था केली. ते घरोघर नीट जातील अशी व्यवस्था करून चित्तरंजन कलकत्त्यास परत आले. कर्तव्याचा थोर आनंद त्या वेळेस त्यांच्या मुखावर झळकत होता.

### राजपुत्राच्या स्वागतावर बहिष्कार

असहकाराच्या कार्यक्रमाचा धूमधडाका चालला होता. विदेशी कापडाच्या प्रचंड होळ्या सर्वत्र होत होत्या. स्वदेशी घरोघर जात होती. चरख्याचें नवजीवन देणारें गुंगूं सुरू होत होतें. स्वयंसेवकदलें सुरू होत होतीं. तिकडे मँचेस्टर ओरडूं लागलें. हिंदुस्थानला संतुष्ट करण्यासाठीं राजपुत्र इकडे येणार असें घोषविण्यांत आलें.

परंतु राजपुत्र येऊन काय करणार ? स्वराज्य देणार आहेत का ? हा अपमानित हिंदुस्थान राजपुत्राचें स्वागत कसें करणार ? कॉंग्रेसनें स्वागतावर बहिष्कार घालण्याचें ठरविलें. राजपुत्र जेथें जेथें जाईल तेथें हरताळ पाळला जावा. जनतेनें स्वतंत्र अशी प्रचंड सभा त्या दिवशीं घ्यावी. अशा सूचना कॉंग्रेसनें दिल्या. सरकारनें स्वयंसेवकदलें बेकायदा ठरविलीं. कॉंग्रेसनें सर्वांना स्वयंसेवक म्हणून नांवें नोंदवा अशी आज्ञा केली. परकी सत्ता व कॉंग्रेस यांचा असा हा तेजस्वी सामना सुरू झाला.

## घरच्यांची तुरुंगांत रवानगी

चित्तरंजनांनीं कलकत्त्यांत स्वागतावरील बहिष्काराचा, तसेंच परदेशी मालावरील बहिष्काराचा प्रचार धूमधडाक्यानें सुरू केला होता. परंतु प्रत्यक्ष कायदेभंगांत त्यांनीं सुरुवात केली. आणि ती आपल्या घरांतून केली. स्वयंसेवकदलें बहिष्कृत होतीं. परंतु कॉंग्रेसचा स्वयंसेवक म्हणून हातांत झेंडा देऊन स्वतःचा एकुलता मुलगा चिररंजन याला त्यांनीं बहिष्काराचा प्रचार करायला, "स्वागतावर बहिष्कार घाला, परदेशी कापड जाळा" अशा घोषणा करायला पाठविलें. चिररंजनास सहा महिन्यांची शिक्षा झाली. अनेक स्वयंसेवकांस सजा झाल्या. लाठीमारहि झाले. चित्तरंजनांनीं या सर्व तरुणांस उद्देशून पुढील पत्रक काढलें.

"जे सहन करीत आहेत, ज्यांना सहन करावें लागलें, सहन करण्यासाठीं जे तयार आहेत, त्यांना मी अधिक काय सांगूं ? स्वातंत्र्यासाठीं असें करावें लागतें, सहन करावें लागतें, असें सांग-

ण्याची काय जरूरी ? परंतु एका फारशी कवीनें दिलेला संदेश मी तुम्हांला देतों:

" निराशेच्या वेळेस, कसोटीच्या प्रसंगीं तुझी श्रद्धा, तुझें धैर्य टिकतील कीं खुटतील ? का कसोटीच्या वेळेस अग्निदिव्यांतून जाऊन तावून सुलाखून अधिकच उज्ज्वल, प्रबळ, उन्नत व तेजस्वी होऊन बाहेर पडशील ? " कवीनें विचारिलें.

" डोक्यावर आकाश कोसळलें तरी मी हार जाणार नाहीं, हिंमत सोडणार नाहीं, श्रद्धा सोडणार नाहीं. " तरुणानें उत्तर दिलें.

" शाबास ! तुझा मार्ग प्रकाशाचा व विजयाचा आहे. जा पुढें. तुझा भविष्यकाल उज्ज्वल आहे. जनता तुझी ऋणी राहील. तुझ्या मस्तकावर शाश्वत विजय राहील. हे तरुणा, तुझी निर्भयता, तुझी दृढता सर्वांत येवो. सारे सजीव होवोत. चैतन्यमय होवोत. जे निर्भय असतात तेच जीवनसंग्रामांत विजयी होतात. तेच आत्म्याचें स्वातंत्र्य मिळवितात. आणि आत्मस्वातंत्र्याहून दुसरें अधिक मोलवान् असें काय आहे ? आत्मस्वातंत्र्याहून अधिक किंमतीचें असें बक्षीस कोणतें ? हे प्रभो, प्रेम आणि प्रकाश यांनीं भरलेल्या या जगाला निर्भयतेची देणगी देण्याची कृपा कर. "

असा हा संदेश चित्तरंजनांनीं दिला.

पुत्राच्या अटकेनंतर दुसऱ्या दिवशीं वासंती देवी हातांत झेंडा घेऊन निघाल्या. चित्तरंजनांची बहीण उर्मिला देवी हीहि निघाली. सुनीति देवीहि निघाल्या. घोषणा करीत त्या चालल्या. त्यांनाहि अटक झाली. चित्तरंजन आनंदले होते. घरीं एका खुर्चींत ते शांत-

पणें बसले होते. इतक्यांत बॅरिस्टर विजयकुमार तेथें आले. ते म्हणाले, " मी गव्हर्नराच्या सेक्रेटरीस भेटलों. हिंदी स्त्रियांचा अपमान कराल तर ब्रि. साम्राज्याचा सत्यनाश होईल असें त्याला सांगितलें. त्यानें लगेच पोलीस कमिशनरला चिठी दिली आहे. वासंती देवी लौकरच मुक्त होऊन येतील. "

चित्तरंजन म्हणाले, " विजय, हें कशाला केलेंस? जाणून-बुजून वासंतीनें तुरुंग पत्करला होता. हें पाऊल टाकलें होतें. "

" वासंती माझी बहीण. तिच्या डोक्यावर लाठी पडती तर? तें का मी सहन करूं? "

" विजय, वासंती तुझी बहीण म्हणून तूं हें सारें केलेंस.दुसऱ्या एखाद्या स्त्रीवर सरकारी हात पडता तर तूं एवढी खटपट केली असतीस का? "

विजयनें खालीं मान घातली.

## सतीचा संदेश

वीरपत्नी वासंतीदेवीनें पुढील संदेश झेंडा घेऊन निघतांना दिला होता :

" आम्हांला पकडण्यांत येईल या तयारीनेंच आम्ही निघत आहोंत. आपलीं मुलें स्वातंत्र्यासाठीं तुरुंगांत जात असतां आपण का घरीं राहायचें? मुलांच्या पाठोपाठ माता. घरीं राहणें सहन होत नाहीं. तरुण तुरुंगांत गेल्यावर त्यांचें अपुरें राहिलेलें काम पुरें करण्यासाठीं मातांनीं बाहेर पडलें पाहिजे. हें बाहेरचें जीवन म्हणजे एक मोठा तुरुंगच आहे. गुलामीची घाणेरडी हवा खात

बाहेर राहण्यापेक्षां तुरुंगांत राहणें अधिक मानाचें आहे. सरकारी संस्थांतील विद्यार्थ्यांनीं बाहेर पडावें. मरण येवो वा विजय मिळो. दोन्ही कीर्ति-करच आहेत! परंतु मरण किंवा स्वतंत्र होऊन जगणें याहून तिसरा मार्ग कोणता? ही गुलामी तर नाहींच राहतां कामा."

आपल्या आयाबहिणी झेंडा हातीं घेऊन बाहेर पडतात. आणि आपण का घरीं बसायचें? शाळाकॉलेजांत जावयाचें? विद्यार्थी खडबडून जागे झाले. स्वयंसेवक होऊं लागले. तुरुंगांत जाऊं लागले. चित्तरंजनांचें हृदय नाचूं लागलें. त्यांनीं पुढील पत्रक प्रसिद्ध केलें.

" स्वराज्य मिळवूं पाहणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यानें तीन प्रकारचें भय सोडलें पाहिजे. जेलचें भय, लाठीमाराचें भय, आणि छातीवर गोळ्या झेलण्याचें भय. जेलची भीति तर गेली. लाठीमाराचेंहि भय जात चाललें आहे. आतां गोळीबाराचें भय कधीं जाईल तें सरकारवर अवलंबून आहे. परंतु आमच्या लोकांना मी आठवण देऊन ठेवतों कीं, आपला मार्ग अहिंसेचा आहे. आपण अहिंसा इतकी पाळूं या कीं प्रत्येक पापभीरु व परमेश्वर मानणारी व्यक्ति आपल्याच बाजूला येईल.

बंगालच्या गव्हर्नरांनीं चित्तरंजनांस भेटीसाठीं बोलाविलें. राजपुत्राचें स्वागत नीट व्हावें, त्या वेळेस गडबड नको अशी सरकारची इच्छा होती. चित्तरंजन भेटीसाठीं गेले. परंतु वाटाघाटींत कांहींहि निष्पन्न झालें नाहीं. सरकारहि दडपशाहीसाठीं दुप्पट जोरानें तयार

झालें. देशभर पुढारी व स्वयंसेवक यांची धरपकड सुरू झाली. लाला लजपतराय, मोतीलाल नेहरू वगैरेंना अटक झाली. हिंदुस्थानभर जवळ जवळ वीस हजार लोक तुरुंगांत गेले आणि चित्तरंजन ?

## एक वर्षाची शिक्षा

डिसेंबर १९२१ ची १० वी तारीख होती. अमदाबाद येथें काँग्रेस भरणार होती. चित्तरंजन अध्यक्ष ठरले. राष्ट्रानें महान् मान त्यांना देऊं केला. चित्तरंजन आपलें अध्यक्षीय भाषण लिहीत होते. तें तयार झालें. परंतु सरकार निराळ्याच रीतीनें त्यांचा सन्मान करण्याच्या तयारींत होतें. २४ डिसेंबरला राजपुत्र कलकत्त्यास येणार होता. त्याच्या आधींच चित्तरंजनांस दूर करण्याची सरकारला जरूरी वाटली आणि १० डिसेंबरला सायंकाळीं ४॥ वाजतां चित्तरंजन यांना कैद करण्यांत आलें. चित्तरंजनांनीं जातांना संदेश दिला :

" हिंदी बंधुभगिनींनो, आजचा हा माझा शेवटचा संदेश आहे. विजय दिसत आहे. कष्ट व हाल थोडे अधिक सहन कराल तर विजयाच्या जवळ जाल. अशा वेदनांतूनच राष्ट्राचा जन्म होत असतो. या वेदना पूर्ण शान्तीनें, धैर्यानें व निर्भयतेनें सहन करा. तुम्ही जोंपर्यंत खरोखर अहिंसक रहाल तोंपर्यंत सरकारचा पक्ष सदैव खोटाच राहणार. महात्माजींनीं दाखविलेल्या मार्गापासून तसूभरहि पदच्युत व्हाल तर नोकरशाहीचा विजय होईल. स्वराज्य हें आपलें ध्येय आहे. स्वराज्याचे हप्ते नकोत. तुकडे नकोत. सारें

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ३३०२२ नों दि
वि. आतिथ्य

संपूर्ण स्वराज्य आम्हांला पाहिजे आहे. आपलें ध्येय आपण प्राप्त करून घेणार कीं नाहीं हें भारतीय नरनारींनो, तुम्हीच सांगूं शकाल.

नेमस्त बंधूंनो, तुम्ही ज्या मार्गानें जाऊं पहात आहांत त्या मार्गानें कधींहि कोणाला स्वातंत्र्य मिळालें नाहीं. साऱ्या जगाचा इतिहास पहा. हा इतिहास तुम्हांला हेंच सांगेल. तुम्ही नोकरशाहीच्या बाजूनें उभे राहणार कीं देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्यांच्या बाजूनें येणार ? लहानसान गोष्टींत तडजोड होऊं शकते. परंतु जो प्रश्न आपल्याला व या नोकरशाहीला अलग राखीत आहे, त्या प्रश्नाचे बाबतींत तडजोड कशी होणार ? तुम्ही हिंदुस्थानचे कैवारी नसाल तर तुम्ही लोकशाहीच्या बाजूचे आहांत.

विद्यार्थ्यांनो, तुम्हीं हिंदुस्थानची भावी आशा आहांत. अंकगणित किंवा अक्षरज्ञान यांत खरें शिक्षण नाहीं. आपली सर्वांची एकच माता, जी भारतमाता, तिची सेवा करण्यांत खरें शिक्षण आहे. मातेचें काम करण्याची ही वेळ आहे. माता हांक मारीत आहे. तुमच्यापैकीं कोण त्या हांकेला उत्तर देणार ? ”

असा संदेश देऊन चित्तरंजन तुरुंगांत गेले. त्यांचा खटला चालून एक वर्षाची त्यांना साधी सजा देण्यांत आली.

## तुरुंगांत

चित्तरंजन तुरुंगांत देशाचीच चिंता रात्रंदिवस करीत. कांहीं ठिकाणीं स्वयंसेवकांस फटके मारण्यांत आले. चित्तरंजनांच्या हृदयाची तगमग होई. परंतु राजपुत्र आले त्या दिवशीं कलकत्त्यांत कडकडीत

हरताळ होता. रस्त्यांतून शुकशुकाट होता. ती वार्ता ऐकून चित्त-रंजनांस समाधान झालें.

**तिनें हें सहन कसें केलें ?**

आणि बारिसाल येथें राजकीय परिषद होती. वासंतीदेवी तेथें अध्यक्ष होत्या. परंतु 'वंदेमातरम्' गाणें म्हणायला तेथील मॅजिस्ट्रेटनें बंदी केली. चित्तरंजनांच्या कानांवर ही गोष्ट आली. ते क्रोधानें थर-थरत होते. 'वंदेमातरमूला' बंदी ? राष्ट्रीय गीताला बंदी ? आणि वासं-तीनें हें सहन कसें केलें ? कसें केलें तिनें सहन ? असें म्हणत वाघाप्रमाणें, सिंहाप्रमाणें ते फेऱ्या घालीत होते. अति प्रक्षुब्ध ते झाले होते. आणि वासंतीदेवी भेटायला आल्या. ते गुरगुरले. परंतु वासंतीदेवी म्हणाल्या, " ती बंदी मागून काढून घेण्यांत आली होती. आम्ही तो अपमान सहन केला नसता. बंदी मोडून गाणें म्हटलेंच असतें. लाठीमार सहन केला असता. तुम्ही शांत व्हा. " चित्तरंजनांच्या आत्म्याला समाधान झालें.

**बरोबरच्यांस घरचें अन्न देत**

चित्तरंजनांस घरच्या अन्नाचा डबा येई. परंतु तेथें अशक्त व आजारी असणारांस ते आपला डबा देत. आधीं त्यांना खायला देऊन मग आपण खात. स्वत:पेक्षां इतरांची त्यांना काळजी. म्हणून तर त्यांचा शब्द झेलला जाई.

**देशांतील स्थिति**

बरोबरचे सहकारी तुरुंगांत गेले. गांधीजी अद्याप बाहेर होते. अमदाबादच्या कॉंग्रेसला चित्तरंजन येऊं शकले नाहींत. त्यांचें

अध्यक्षीय भाषण वाचून दाखविण्यांत आलें. अधिवेशन झालें. महात्माजी बार्डोली तालुक्यांत करबंदीची चळवळ करणार होते. सरकारला न मानण्याची चळवळ तेथें होणार होती. बार्डोलीकडे साऱ्या देशाचे डोळे लागले. परंतु तिकडे संयुक्त प्रांतांत हिंसेचे प्रकार झाले. महात्माजींनीं बार्डोलीची चळवळ बंद ठेवली. महात्माजींवर पुष्कळजण रागावले. राष्ट्राचा हा तेजोभंग आहे असें कोणी म्हणाले. परंतु महात्माजी अविचल राहिले. आणि सरकारनें आतां महात्माजींसाहि अटक केली. सहा वर्षांची त्यांना शिक्षा देण्यांत आली. चळवळ थांबली. उत्साह ओसरला. देशांत एक प्रकारची निराशा पुन्हां पसरली.

## स्वराज्य पक्षाची स्थापना

सत्याग्रहाचा एक प्रयोग झाला. स्वातंत्र्याची प्राप्ति होईपर्यंत असे अनेक झगडे करावे लागतात. एक वर्षांत स्वराज्य अशी महात्माजींची घोषणा होती. त्यांच्या सांगण्याप्रमाणें सारें राष्ट्र वागतें तर एका आठवड्यांताहि स्वराज्य मिळालें असतें. सर्व राष्ट्रीय संपाचा तो प्रयोग होता. निःशस्त्र राष्ट्राला तो पहिला धडा होता. महात्माजी मोठमोठ्या गोष्टी शिकवीत होते तुटपुंज्या गोष्टी नकोत. लाखों चरखे सुरू करा. कोट्यवधि सभासद करा. कामाचे डोंगर आहेत. काम करायला या. अशी त्यांनीं हांक मारली. सत्याग्रहाची लाट ओसरली. परंतु बाहेर पडलेले विद्यार्थी, वकील्या सोडलेले वकील हे नवीन कायमचे सेवक राष्ट्राला मिळतील अशी आशा होती. त्यांच्यापैकीं कांहींजण तरी मिळतील. प्रांताप्रांतांतून, जिल्ह्याजिल्ह्यांतून

अशीं माणसें पुढें आलीं होतीं. त्यांच्यामार्फत सेवेच्या साधनानें सर्वत्र प्रचंड संघटना महात्माजी करूं इच्छित होते. आणि पुन्हां चळवळ, पुन्हां लढाई योग्य वेळ येतांच करणार होते. परंतु महात्माजी तुरुंगांत. बाहेर नवीन कार्यक्रम द्यायला कोणी नाहीं. विधायक कामाचा अद्याप अनुभव नाहीं. देशांत स्तिमितता पसरली. अशा वेळेस प्रांतिक विधिमंडळांतून घुसावें, तेथें सरकारचे पुनः पुन्हां पराजय करावे, दिलेल्या सुधारणा कशा पै किंमतीच्या आहेत तें जगाला दाखवावें असें चित्तरंजनांना वाटलें. विधिमंडळावरील बहिष्कार उठवावा, निवडणुका लढवाव्या, असें चित्तरंजन यांना वाटलें. ते आतां सुटून बाहेर आले होते. ते विचार करूं लागले. मोतीलाल नेहरू, लजपतराय वगैरेंना ते भेटले. गया काँग्रेसमध्यें हा नवीन कार्यक्रम त्यांनीं मांडला. परंतु तो नामंजूर झाला. चित्तरंजन कचरले नाहींत. त्यांनीं स्वतंत्र स्वराज्यपक्षाची स्थापना केली. मद्रास प्रांतांत मोठा दौरा काढला. परंतु महात्माजींच्यावर शस्त्रक्रिया होऊन ते सुटले. विश्रांतीसाठीं महात्माजी मुंबईजवळ जुहू येथें राहिले. त्यांना भेटायला चित्तरंजन आले. नेहरू आले. शेवटीं महात्माजींनीं तडजोड केली. काँग्रेसनें स्वराज्यपक्षाच्या कार्यक्रमास मंजुरी दिली. काँग्रेसचें मुख्य लक्ष विधिमंडळाकडे नव्हतें. मुख्य कार्यक्रम विधायक कार्याचा. परंतु ज्यांना विधिमंडळांत जाऊन झगडायचें होतें त्यांना काँग्रेसनें परवानगी दिली. महात्माजींनीं ऐक्य साधिलें. ते स्वतः विधायक कार्याकडे, ठायीं ठायीं आश्रमांचीं जाळीं पसरून त्यांच्या द्वारां जनता जागृत व संघटित करण्याकडे वळले.

अनुक्रम २८८८८
विभाग वाङ्मय
क्रमांक ९०.६०
नों. दि. ३७।३।६

## विधिमंडळांतील तेजस्वी कार्य

मोतीलाल नेहरू, लालाजी, विठ्ठलभाई पटेल, इत्यादि थोर मंडळी दिल्लीच्या वरिष्ठ विधिमंडळांत गेली. चित्तरंजन बंगाल प्रांतिक विधिमंडळांत गेले. सरकारचा हमखास पराजय करण्याइतकी त्यांची शक्ति नव्हती. परंतु त्यांनीं मुसलमानांचा पाठिंबा मिळविला. हिंदु–मुस्लीम करार त्यांनीं केला. बंगालनें हिंदुस्थानला शिकविलें कीं परकी सत्ता दूर करायची असेल तर मुसलमानांस जवळ करा. त्यांच्या ज्या मागण्या रास्त असतील, देशाहितास व देशैक्यास विघातक नसतील त्या द्या. मागतील त्याहून थोडें अधिक द्या. केवळ तराजू घेऊन नका बसू. आज बॅ. जिना हिंदुस्थानचे तुकडे करूं पाहतात, असल्या मागण्या चित्तरंजन पुरे करते ना. परंतु देशाचें अखंडत्व राखून जितकें करतां येईल तितकें करायला हरकत नाहीं. चित्तरंजनांनीं ही गोष्ट केली. देशाचें खरें हित करूं पाहणारा कोणीहि थोर दृष्टीचा देशभक्त हेंच करील. म्हणून लोकमान्यहि कधीं म्हणत " आधीं इंग्रज जाऊं दे. मुसलमानांच्या हातीं सत्ता आली तरी चालेल. " स्वातंत्र्य आलें कीं भांडणें बंद होतील. सर्वांना सहकार्यानें नांदतां येईल. म्हणून स्वातंत्र्यावर आधीं लक्ष हवें. कॉंग्रेस अशा थोर मार्गानें जात आहे. मुसलमानबंधूंजवळ करार करून चित्तरंजनांनीं सरकारचे पुनःपुन्हां पराजय केले. अंदाजपत्रकें नामंजूर केलीं. दिवाणांचा पगार तीन रुपये असे ठराव बहुमतानें पास केले. परंतु गव्हर्नर जनतेचें मत धुडकावून आपल्या लेखणीनें सारें मंजूर करून घेई. या सुधारणा म्हणजे सारा

फार्स आहे. जनतेच्या प्रतिनिधींना खरी सत्ता कशी नाहीं, तें जगाला दिसून आलें.

## एकच प्रतिभावान् पुरुष

देशबंधूंचा हा स्वराज्यपक्ष पाहून श्री. अरविंद घोष म्हणाले, " काळवेळ पाहून कसें वागावें, परिस्थित्यनुरूप कसें धोरण आंखावें, हें ओळखण्याची व तदनुरूप वागण्याची प्रतिभा व धीरता एका देशबंधूंतच आहे. बंगालमध्यें असा दुसरा कोण आहे ? '

## त्यांना कसेंहि करून पाठवा

आणि एकदां चित्तरंजन आजारी होते. विधिमंडळांत हजर होणें फार आवश्यक होतें. वासंतीदेवींना पतीचा स्वभाव माहीत होता. हे गेल्याशिवाय राहणार नाहींत अशी त्यांची खात्री होती. वासंतीदेवी डॉक्टरांस म्हणाल्या, " गाडी करा, डोली करा; कांहीं करा. परंतु यांना विधिमंडळांत पाठवण्याची लौकर कांहीं व्यवस्था करा. पृथ्वीवरची कोणतीहि शक्ति यांनीं एकदां निश्चय केला म्हणजे त्याला फिरवूं शकणार नाहीं. तुम्ही दुसरी कांहीं व्यवस्था न कराल तर हे पायीं चालत जातील. आणि त्याचा परिणाम तुमच्या माथीं बसेल. " आणि आजारी देशबंधु विधिमंडळांत गेले. सरकारची फजीती करते झाले. मुसलमान बंधूंस फोडण्यासाठीं सरकार कशी कारवाई करीत होतें, त्याचे कांहीं कागदपत्र चित्त-रंजनास मिळाले होते. त्यामुळें चित्तरंजन यांनीं सरकारला खालीं पहायला लावलें. " जरूर तर तो पत्रव्यवहार मी येथें हजर करीन. " असें म्हणतांच सरकारी दिवाणांचे चेहरे खर्रकन उतरले.

## दहा लक्ष रुपयांचा फंड

चित्तरंजन केवळ विधिमंडळांतच रमले होते असें नाहीं. खेडे-गांवांची स्थिति कशी सुधारेल, शेती कशी सुधारेल, बेकारांना उद्योग कसा मिळेल याचा ते सारखा विचार करीत होते. चरख्याचें महत्त्व त्यांना पटलें होतें. ग्रामसुधारणा व ग्रामोद्योग यांची त्यांना चिंता होती. या विधायक कामासाठीं बंगालप्रांतापुरता दहा लाख रुपये गोळा करण्याचा त्यांनीं संकल्प केला. आणि त्या कामाला ते लागले. स्वयंसेवक हिंडतच होते. परंतु ते स्वतः क्षणाचीहि विश्रांति घेत नव्हते. सकाळीं बाहेर पडत ते दोन वाजतां घरीं येत. पुन्हां थोडें खाऊन बाहेर पडत ते रात्रीं घरीं येत. व्यापारी कारखानदार, दुकानदार सर्वांच्या समोर हा महापुरुष जाई व हात पसरी.

## त्यागाची परमावधि

त्यांनीं आपली वकीली कधींच सोडली होती. एकदां एका महत्त्वाच्या खटल्यांत गुंतलेले कांहीं लोक चित्तरंजनांकडे आले व म्हणाले, " दहा लाख रुपये आम्ही तुमच्या फंडाला देतों. परंतु आमचे वकील व्हा. " चित्तरंजनांनीं नको म्हटलें. जें सोडलें तें सोडलें. परंतु अद्याप त्यांचें मोठें घर होतें. एके दिवशीं तें घरहि त्यांनीं देशासाठीं दिलें. ते फकीर झाले. त्यागाच्या जणूं लाटा त्यांच्या हृदयांत उसळत होत्या. बंगाली जनता हा निस्सीम त्याग पाहून गहिंवरली. चित्तरंजन यांना कोणत्या विशेषणानें गौरवावें तें वर्तमानपत्रकारांना समजेना. शेवटीं एका वर्तमानपत्रानें " देशबंधु "

हें विशेषण त्यांना लावलें. तें विशेषण सर्वांना आवडलें. चित्तरंजन देशबंधु झाले.

**प्रकृति बिघडली**

अपरंपार श्रम पडत होते. स्वराज्यपक्षाचे ते प्राण होते. विधिमंडळांतील काम पहावयाचें. टीकाकारांना उत्तरें द्यायचीं. विधायक कार्याची योजना करायची. फंड जमवायचा. त्यांचें शरीर थकत चाललें. परंतु अधिकाधिक काम येतच होतें. कलकत्ता कार्पोरेशनचे ते मेयर झाले. म्युनिसिपालिटीच्या कामांत लक्ष घालूं लागले. शुद्ध दूध कसें मिळेल, गरिबासाठीं चाळी कशा बांधता येतील, शिक्षण मोफत व सक्तीचें करणें, किती तरी प्रश्न त्यांच्या डोळ्यांसमोर होते. स्वतःच्या मतप्रचारासाठीं " फॉर्वर्ड " हें वर्तमानपत्रहि त्यांनीं सुरू केलें. या कामाच्या बोजाखालीं प्रकृति बिघडत चालली. तरी ते काम करीतच राहिले.

**सरकार**

विधिमंडळांत होणारे पराजय सरकारला झोंबले. देशबंधूंची शक्ति कशांत होती ? देशबंधूंच्या भोंवतीं शेंकडों तरुण कार्यकर्ते होते. श्री. सुभाषचंद्र बोस आय्. सी. एस्. होऊन आलेले. परंतु असहकाराच्या त्या काळांत कोणता ध्येयार्थी तरुण नोकरीकडे वळणार ? सुभाषचंद्र देशासाठीं धांवून आले. अलौकिक बुद्धि, संघटनापटुत्व, त्यागाची हौस, रुबाबदार व तेजस्वी मूर्ति, असे ते तरुण सुभाषचंद्र होते. चित्तरंजनांचे ते उजवा हात बनले. कलकत्ता म्युनिसिपालिटीचे ते चीफ ऑफिसर नेमले गेले. देशबंधूंचा हा वाढता

व्याप, ही वाढती शक्ति सरकारला पहावेना. देशबंधूंचे पंख तोडून टाकायला सरकार तयार झालें. सुभाषचंद्रांना बेमुदत अटक करण्यांत आली. आणखीहि अनेक तरुणांना गिरफदार करण्यांत आलें. दडपशाहीचा वरवंटा पुन्हां फिरूं लागला.

## हुतात्मा गोपीनाथ शहा

आणि तरुण गोपीनाथानें बॉंब फेकला. कोणी साहेब मेला. गोपीनाथ फांसावर गेला. चित्तरंजनांना वाईट वाटलें. तरुणांनीं हा दहशतवाद सोडावा असें त्यांना वाटे. परंतु या तरुणांचा मार्ग चुकला तरी त्यांची धीरोदात्तता, त्यांचा त्याग यांचें कोण कौतुक करणार नाहीं? देशबंधूंनीं गोपीनाथाचा मार्ग चुकला तरी त्याची त्यागवृत्ति सर्वांनीं पूजावी, आपलीशी करावी असें लिहिलें. देशबंधु का अहिंसावादी नव्हते? ते अहिंसावादीच होते. या देशाला दुसरा मार्ग नाहीं ही गोष्ट त्यांना पटत होती. परंतु तरुणांच्या त्यागाचा गौरव केल्याशिवाय त्यांना राहवेना.

## महात्माजीविषयीं परमभक्ति

देशबंधूंचे व महात्माजींचे मतभेद असत. परंतु अहिंसेच्या बाबतींत त्यांचें एकमत होतें. विधायक कार्य, हिंदुमुस्लीम ऐक्य या प्रश्नांवर एकमत होतें. चित्तरंजनांनीं दिलदारी दाखवून जो हिंदु-मुस्लीम पॅक्ट केला होता, त्याबद्दल महात्माजींनीं त्यांना धन्यवाद दिले होते. एकदां देशबंधूंचे एक मित्र महात्माजीविषयीं वाटेल तें कटु बोलूं लागले. देशबंधु त्याला म्हणाले, " तूं हें काय बोलतोस? कोणाविषयीं बोलतोस? कोणासमोर बोलतोस? जा.

पुन्हां तुझें मी तोंड पाहणार नाहीं. " महात्माजींची निंदा करणाऱ्या त्या मित्राचा देशबंधूंनीं कायमचा त्याग केला. कितीहि मतभेद महात्माजींजवळ असले तरी ते राष्ट्राचे निर्माते होते. या हतपतित राष्ट्रांत केवढा प्राण त्यांनीं ओतला ! त्यांची का निंदा करावी, नालस्ती करावी ? महाराष्ट्रांतील निंदकांनीं देशबंधूंची ही उदात्तता थोडी घ्यावी.

## हें असें नेहमीं होतें

कॉंग्रेसच्या कार्यकारिणीची सभा असावी. देशबंधु ठरवून ठेवीत कीं आज महात्माजींना असें अडवायचें, असा युक्तिवाद करावयाचा. परंतु सभेचें काम सुरू होई. महात्माजी आपला कार्यक्रम मांडीत. गोड व शांत विचारसरणीनें सर्वांच्या शंका फेडीत. रागावणें नाहीं, रुसणें नाहीं. मध्येंच हसतील व विनोद करतील. आणि शेवटीं स्वतःचा कार्यक्रम ते सर्वांकडून मंजूर करून घेत. सभेचें काम संपल्यावर देशबंधु म्हणायचे " नेहमीं हें असें होतें. आम्ही मारें ठरवितों. परंतु शेवटीं महात्माजी जिंकून घेतात. "

## वज्राप्रमाणें इच्छाशक्ति

बंगाल प्रांतिक सभेंत देशबंधूंना हिंदुमुस्लीम करार मंजूर करून घ्यायचा होता. प्रथम पुष्कळ विरोध होता. देशबंधु सर्वांचे शंकासमाधान करीत होते. कधीं ते बुद्धिवाद करीत, कधीं ते भावना उचंबळवीत. रात्रीं १ वाजला तरी परिषदेचें काम चाललें होतें. शेवटीं त्या करारास मंजुरी मिळाली. देशबंधूंचा जय झाला. त्यांच्या एका मित्रानें त्यांना विचारलें, " तुमचा विजय होईल असें वाटत

नव्हतें ? कशाच्या जोरावर तुम्हीं जिंकलेंत ? " देशबंधु म्हणाले, " इच्छाशक्तीच्या जोरावर. करारास मंजुरी घेतल्याशिवाय मी उठलों नसतों. " देशबंधूंची इच्छाशक्ति अजिंक्य होती. जें एकदां ठरवीत, निश्चित करीत तें पुरें केल्याशिवाय ते सोडीत नसत. सारी शक्ति त्या कामीं ते लावीत.

## सहकार्याचा हात

प्रांतिक विधिमंडळांत सरकारी सुधारणांचा डोलारा त्यांनीं मोडून फेकून दिला. परंतु देशबंधु केवळ विध्वंसक टीका करणारे नव्हते. नवीन बांधण्यासाठीं जुनें पाडावें लागतें. त्या क्षुद्र सुधारणा उडवून खरें स्वराज्य देतां का असें ब्रि. साम्राज्य सरकारला त्यांनीं विचारलें. १९२५ च्या मेच्या पहिल्या तारखेस बंगाल प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें फरीदपूर येथें त्यांनीं भाषण केलें. त्यांत सहकार्याचा हात त्यांनीं पुढें केला होता. ब्रिटिश साम्राज्यांत स्वतंत्र भाग म्हणून हिंदुस्थान राहील असें ते म्हणाले. मुत्सद्देगिरीचें तें भाषण होतें. कळकळीचें तें भाषण होतें. आशियांतील राष्ट्रांचा संघ बनवावा ही कल्पनाहि त्यांत होती. त्या वेळेस बर्कनहेड हे स्टेट सेक्रेटरी होते. तो देशबंधूंच्या भाषणास काय उत्तर देतो तें पहावयाचें होतें. परंतु साम्राज्य सरकार ताठरच राहिलें. सहकार्याचा हात झिडकारला गेला. सहकार्य नको असेल तर पुन्हां असहकाराचा प्रचंड लढा राष्ट्र करील असेंहि आव्हान देशबंधूंनीं दिलें होतें. परंतु देशबंधूंना मृत्यूशीं लढा करण्याची वेळ आली. फरीदपूरनंतर ते पुन्हां आजारी पडले. महापुरुष

अंथरुणाला खिळला. अध्यात्मविचारांत व प्रभुचिंतनांत पडल्या पडल्या रंगला.

## वैराग्य

देशबंधु वैभवाच्या शिखरावर होते. परंतु एकदम त्यांनीं दारिद्र्याला मिठी मारली. ते पूर्वी मद्य घेत. परंतु त्याचा त्यांनीं त्याग केला. ते मांसाहार करीत. त्याचाहि त्यांनीं त्याग केला. फक्त धूम्रपान त्यांना सोडवेना. ते आपल्या एका मित्राला म्हणाले, " तूं वकीली सोडीत असशील तर मला न सोडवणारी ही सिगारेटहि मी सोडीन. "

## देशसेवकाला गादी शोभत नाहीं

सत्याग्रही झाल्यावर देशबंधु घोंगडीवर निजूं लागले. एकदां एका मित्राकडे ते उतरले होते. ते आपली पाठ चेपीत होते. मित्रानें विचारलें, " पाठ का दुखते ? "

" हो. " ते म्हणाले.

" कशानें दुखते ? तेल चोळूं ? आयोडाइन लावूं ? डॉक्टर बोलावूं ? नेहमीं का दुखते ? सांगा ना ? "

" काय सांगूं ? या पाठीला गादीवर निजण्याची संवय आहे. हल्लीं घोंगडीच असते. म्हणून ती दुखत आहे. "

" मग गादी घालूं का ? "

" देशसेवकाला गादी शोभत नाहीं. " ते रागानें म्हणाले.

## आणखी दोन घास खा

त्यांचें जेवण्यांतहि लक्ष नसे.परंतु वासंतीदेवी नेहमीं जवळ असत. देशबंधूंनीं कमी खाल्लें तर त्या म्हणायच्या, "आणखी दोन घास खा." अधिक खाऊं लागले तर वासंती देवी म्हणायच्या, "पुरे हो आतां."

## औदार्य

देशबंधूंच्या औदार्याच्या किती गोष्टी सांगाव्या? किती गुप्त दानें, मूकदानें. बहिणीचा आश्रम नीट चालवा म्हणून दोन लाख रुपये त्यांनीं दिले. परंतु तें दान कोणासाहि माहीत नव्हतें. कधीं कोणी त्यांच्याकडे उसनवार रक्कम मागायला येई. ते लगेच देत. एकदां वसुमती पत्राचे चालक एकदम ४० हजार रुपये मागायला आले. देशबंधूंनीं व्यवस्था केली. एका अक्षरानेंहि कांहीं विचारलें नाहीं. कोणी आप्त म्हणाले, " चित्तरंजन, उद्यां पैसे न मिळाले तर ? "

" परत मिळण्याच्या विचारानें मी कधीं देत नसतों " ते म्हणाले. एकदां एक गरीब विद्यार्थी अडचणींत होता. " देशबंधूकडे जा " त्याला कोणी म्हणाले. तो देशबंधूकडे आला. त्याची कायमची व्यवस्था झाली. शेंकडों विद्यार्थ्यांना त्यांनीं मदत केली होती.

## मतभेद तरीहि मदत

बिपिनचंद्रपाल हे जुने देशभक्त. मोठे विद्वान्. परंतु असहकार त्यांना मान्य नव्हता. महात्माजींना ते मिस्टर गांधी म्हणूनच संबोधायचे. तरीहि देशबंधु पूर्वीप्रमाणेंच त्यांचा सारा खर्च चालवीत.

## महात्माजींना सारे पैसे दिले

१९०३ सालची गोष्ट. महात्माजी दक्षिण आफ्रिकेंतून मदत गोळा करण्यासाठीं आले होते. कलकत्त्यांत ते चित्तरंजनांनाहि भेटले. त्या वेळेस चित्तरंजन गरीब होते. परंतु स्वतःच्या बँकबुकांत जेवढे पैसे होते, तेवढे सारे त्यांनीं गांधीजींना दिले.

## उपाशी होतास, मग आधीं कां नाहीं आलास?

त्यांच्या फॉर्वर्ड पत्राच्या कचेरींत एक नोकर होता. तो वेळच्या वेळीं काम करीत नसे. एकदां टपाल घेऊन त्याला पाठवण्यांत आलें. परंतु त्यानें पोस्टांत जायला उशीर केला. पत्रें गेलीं नाहींत. देशबंधु रागावले. असा मनुष्य आम्हांला नको असें ते म्हणाले. त्याला कामावरून कमी करण्यांत आलें. परंतु दोन दिवसांनीं तो मनुष्य पुन्हां देशबंधूंकडे आला.

" मला पुन्हां कामावर घ्या. दोन दिवसांचा मी उपाशी आहें " तो म्हणाला.

"दोन दिवस उपाशी होतास, मग आधीं कां नाहीं आलास? तुला कामावर नाहीं घेणार. कारण तूं काम नीट करीत नाहींस. परंतु तुला कोठें उद्योग मिळेपर्यंत तूं माझ्याकडे जेवत जा " असें देशबंधु म्हणाले.

## शंभराची नोट दिली

आणि ती जुहू येथील एक गोष्ट आहे. महात्माजींना भेटायला देशबंधु आले होते. तेथें दुसरेहि पुढारी होते. देशबंधु व दुसरे कांहीं पुढारी समुद्रांत नौकाविहारास जात. आणि त्यांची जायची

वेळ आली. मुंबईचे एक पुढारी तेथें होते. त्यांना वाटलें या नावाड्याला देशबंधु कितीसें बक्षीस देतील? पांच रुपये देतील. आपण दहा द्यावे. असें मनांत आणून त्या मुंबईच्या सद्‌गृहस्थानें दहा रुपयांची नोट त्या नावाड्याला दिली. आणि चित्तरंजनांनीं खिशांत हात घातला. शंभर रुपयांची नोट काढून त्यांनीं दिली. तो मुंबईचा थोर पुरुष ओशाळला व देशबंधूस म्हणाला, "दान-वृत्तींत, औदार्यांत कोणीहि तुमची बरोबरी करूं शकणार नाहीं."

## मी आधीं कसा जेवायला बसूं?

जुहूचीच ती दुसरी एक गोष्ट. एकदां तिथला एक मनुष्य कांहीं कामासाठीं मुंबईस गेला होता. जेवायला परत येईन असें सांगून तो गेला होता. परंतु बराच वेळ झाला तरी तो आला नाहीं. जेवण वाट पहात होतें.

"चला आपण बसूं." तेथें असलेले सारे पुढारी म्हणाले.

"आपण आधीं कसें बसायचें? तुम्ही वाटलें तर बसा. मी थांबतों. मी आधीं कसा जेवूं?"

शेवटीं बाकीचे जेवायला बसले. देशबंधु तो कामाला गेलेला मनुष्य आला तेव्हांच त्याच्याबरोबर जेवले.

## स्वयंसेवकांना स्वतः वाढीत

ही सहृदयता, ही माणुसकी देशबंधूंजवळ होती. त्यांच्या प्रेमळ-पणाला सीमा नव्हती. कलकत्त्यांत जेव्हां कधीं स्वयंसेवकांस खूप-काम पडे, तेव्हां रात्रीं त्यांना ते आपल्या घरीं बोलावीत. त्यांना

स्वत: जेवायला वाढीत. त्यांच्याबरोबर बोलत बसत. त्यांचें कौतुक करीत. यामुळेंच ते तरुणांचे जीव कीं प्राण झाले.

**हे तरुण हीच माझी शक्ति**

एकदां देशबंधु बसले होते. त्यांच्याजवळ कांहीं तरुण कार्यकर्ते बसले होते. आलेले एक परप्रांतीय पाहुणे म्हणाले, " देशबंधु, तुम्ही जें जें काम हातीं घेतां तें यशस्वी करतां. कोठून आणतां ही शक्ति ?" जवळच्या कार्यकर्त्यांकडे बोट करून देशबंधु म्हणाले, " माझी शक्ति म्हणजे हीं माझीं कष्टाळु माणसें. जिवापाड काम करणारीं त्यागी माणसें. " देशबंधु जणुं सहस्रबाहु होते. हजारों माणसें त्यांचें काम करायला तयार असत. त्यांचा शब्द झेलायला तयार असत. ज्यानें सांगितलेलें काम करावयास अशीं शेंकडों माणसें जवळ आहेत, असा देशबंधूंशिवाय दुसरा कोण पुढारी होता ? परंतु ही कार्यकर्त्यांची शक्ति देशबंधूंनीं कशीं मिळविली ? आपल्या प्रेमानें, उदारपणानें, सहानुभूतीनें.

**त्यांच्या देशभक्तीस तुलना नाहीं**

स्वामी विवेकानंद, ब्रह्मबांधव उपाध्याय व देशबंधु यांच्या देशभक्तीस तुलना नाहीं असें बंगालमध्यें म्हणतात. देशबंधूंची देशभक्ति म्हणजे एक महाकाव्य आहे. देशबंधूंनीं पूर्वी काव्यें लिहिलीं. ती त्यांची प्रतिभा पुढें का मेली ? तें काव्य का लोपलें ? ती बांसरी का बंद पडली ? नाहीं. त्यांच्या त्या बांसरीनेंच त्यांना कर्मवीर बनविलें. त्यांच्या कविवृत्तीनें त्यांना वीरवृत्ति दिली. देशबंधूंच्या काव्यप्रतिभेला आलेलें सुंदर फळ म्हणजे त्यांची देश-

भक्ति. देशबंधूंची देशभक्ति काव्यमय वाटते. तिच्यांत मधुरता आहे, कोमलता आहे. तिच्यांत स्फूर्ति आहे. त्यांच्या देशभक्तींत सागरसंगीत आहे. कवीच्या हृदयांत भावनांच्या लाटा उसळतात, तशा देशबंधूंच्या देशभक्तींत, त्यांच्या त्यागांत मोठमोठ्या लाटा दिसतात. आज हें सोडलें, उद्यां तें सोडलें, अशी देशभक्तीची प्रतिभा दिवसेंदिवस पल्लवित होतांना दिसते. देशाला त्यांनीं अक्षरश: तनमनधन दिलें.

**आशुतोश मेले? खरें का हें?**

आशुतोष मुकर्जी हे कलकत्ता विद्यापीठाचे कुलपति. असहकाराच्या काळांत देशबंधूंचे व त्यांचे खटके उडत. परंतु देशबंधूंच्या मनांत आशुतोषांविषयीं अत्यन्त आदर होता.

“एक कोटि रुपये मला द्या. सारें कलकत्ता विद्यापीठ मी राष्ट्रीय करतों.” आशुतोष देशबंधूंना म्हणाले.

“मी देतों एक कोट रुपये आणून” देशबंधु आव्हान स्वीकारून म्हणाले.

परंतु देशबंधूंना किती कामें! आणि तो तुरुंगवास. ती गोष्ट तेवढीच राहिली. देशबंधु जेव्हां जुहूला होते, महात्माजींजवळ स्वराज्यपक्षाची चर्चा करीत होते, त्या वेळेस आशुतोष अकस्मात् एकदम मरण पावले. आशुतोषांची मृत्युवार्ता वाचून देशबंधु स्तंभित झाले. ते कोणाशीं बोलले नाहींत. एकटेच फेऱ्या घालीत होते. आणि मध्येंच म्हणत, “आशुतोष खरेंच का मेले? कसे एकदम गेले?”

## विद्यापीठांत कीर्तन विषय ठेवा

देशबंधु आशुतोषांना एकदां म्हणाले, " हरिकीर्तनाचा विषय तुम्ही विद्यापीठांत कां ठेवीत नाहींत ? कीर्तनविद्या फार पुरातन आहे. जनता शिक्षणाचें हें प्रभावी साधन आहे. तुम्ही या विषयाला स्थान द्या. संगीत व कीर्तन असा विषय ठेवा."

" तुम्ही म्हणतां तें खरें आहे. कीर्तन, मेळे हीं आपलीं ज्ञानप्रसाराचीं साधनें होतीं. यांना विद्यापीठांत वाव हवा. मी विचार करीन." परंतु आशुतोष गेले. आणि देशबंधुहि लौकरच जावयाचे होते.

## त्यांना सांग देशबंधु रडत आहेत

देशबंधूंचा एक मित्र फार सुरापान करी. एके काळीं देशबंधुहि मद्यसेवन करीत. परंतु त्याला प्रमाण असे. आणि आतां तर त्यांनीं संपूर्ण त्याग केला होता. आपल्या या मित्राला ते पुष्कळ वेळां दारू सोडण्यास सांगत. तो मित्र त्या वेळेपुरतें होय म्हणे. निश्चय करी परंतु पुन्हां पूर्वस्थिति येई.

एकदां देशबंधु दौऱ्याहून घरीं परत आले. त्या दिवशीं त्यांचा तो मद्यपी मित्र खूपच दारू प्याला होता. रस्त्यांत पडला होता. त्याला कोणी घरीं आणलें. देशबंधूंना ही गोष्ट कळली. ते अति दुःखी झाले. आपला मित्र दारू पिऊन रस्त्यांत लोळत पडावा ही गोष्ट त्यांच्या हृदयास झोंबली. ते गच्चींत फिरत राहिले. रात्र झाली. शेवटीं त्यांनीं आपल्या मुलाला हांक मारली.

" काय बाबा ? " चित्तरंजनानें विचारलें.

" चिर, माझ्या त्या मित्राकडे जा व त्याला सांग कीं, देशबंधु तुझ्यासाठीं सारखें रडत आहेत. "

तो मित्र आतां सावध झाला होता. भानावर आला होता. इतक्यांत चिररंजन आला.

" काय रे चिर, देशबंधु आले का ? "

" हो. "

" त्यांनीं का कांहीं निरोप पाठवला आहे ? "

" हो. "

" सांग लौकर कोणतें काम ? "

" तुझ्यासाठीं बाबा रडून राहिले आहेत. 'मी सारखा रडत आहे ' असें जाऊन सांग ते म्हणाले. "

तो मित्र मुका झाला. त्याच्याहि डोळ्यांतून पाणी आलें. देश-बंधु आपल्यासाठीं रडत आहेत हें ऐकून त्याला जागृति आली. तो चिररंजनास म्हणाला, " देशबंधूंना सांग कीं, त्यांच्या अश्रूंत माझी दारू कायमची वाहून गेली. "

शेंकडों उपदेशांनीं जें झालें नसतें तें त्या अश्रूंनीं केलें.

## मी भिकारी आहें. मी काय देऊं ?

मरणाआधीं एक वर्षाची ती गोष्ट. वंदे मातरम् गीताचे जनक व वंगीय साहित्यसम्राट् ऋषि बंकीमचंद्र यांच्या पुण्यस्मरणार्थ सभा भरली होती. देशबंधु अध्यक्ष होते. त्यांनीं लहानसेंच भाषण केलें. परंतु किती भावनोत्कट भाषण ! डोळ्यांत मध्येंच अश्रुबिंदु चमकत. श्रोते तटस्थ होते. श्वाससुद्धां हळुवारपणें जणुं घेत होते. भाषणा-

नंतर सभेंत बंकीमचंद्रांची स्मृति साजरी करण्यासाठीं फंड गोळा करण्याचें ठरलें. तेव्हां देशबंधु सद्गदित कंठानें म्हणाले, " मी तर भिकारी आहें. मी आतां काय देऊं ? "

ते शब्द श्रोत्यांच्या हृदयांत गेले. जलधर नांवाचा एक वृद्ध मनुष्य तेथें होता. तो एकदम उठून म्हणाला, " तुम्ही भिकारी ? असें नका म्हणूं. हे शब्द आमच्या हृदयाला कांट्यांप्रमाणें बोंचतात. तुम्ही भिकारी नाहीं. तुम्ही राजराजेश्वर आहांत. आमच्या प्राणांची तुम्ही देवता. "

**माझी देशभक्ति म्हणजे देवभक्ति; माझें राजकारण म्हणजे धर्म**

असे हे देशबंधु होते. देशबंधु म्हणजे बंगालचें मूर्त स्वरूप. बंगाली लोकांतील गुण वा अवगुण यांची ते मूर्ति होते. बंगालवर त्यांचें अपार प्रेम. बंगालची हवा, बंगालचें पाणी. त्यांच्या रोम-रोमांत बंगाल होता, परंतु त्यांच्याजवळ प्रांतीयता नव्हती. हृदयांत शेवटीं आंत भारतमाताच होती. मारुतीच्या हृदयांत श्रीराम, त्या-प्रमाणें देशबंधूंच्या हृदयांत भारतमाता. त्यांची देशभक्ति म्हणजे देवभक्ति होती. कलकत्त्यास विद्यार्थ्यांच्या एका सभेंत ते म्हणाले होते:

" ज्याला देशभक्ति असें म्हणतात ती माझ्याजवळ नाहीं. मी स्वतः देशभक्त नाहीं. मी देवाला मानतों आणि माझ्या मतें परमे-श्वराची प्रकट दीप्ति म्हणजेच देश. "

ते आणखी एकदां म्हणाले, " माझें राजकारण माझ्या धर्माचें एक अंग आहे. " बंगाल प्रांतिक परिषदेचे ते प्रथम अध्यक्ष झाले.

तेव्हां त्या भाषणांत ते म्हणाले, " ज्ञानानें, वयानें, सेवेनें अध्यक्ष होण्यास मी पात्र नसेन. परंतु प्रेमाच्या बळावर मी येथें बसलों आहें. बंगालवर प्रेम करण्यांत मी कधीं कोणास हार जाणार नाहीं. बाळपणांत हाच बंगाल माझ्या हृदयांत होता. तारुण्यांत तोच होता. आजाहिं तोच बंगाल माझ्या हृदयांत आहे. "

## दार्जिलिंग

असे हे त्यागमूर्ति देशबंधु, प्रेमसिंधु देशबंधु सारखी अविश्रान्त सेवा करून आजारी पडले. आणि विश्रांति मिळावी, प्रकृति सुधारावी म्हणून ते दार्जिलिंगला जाऊन राहिले. हिमालयाचीं धवल शिखरें तेथून दिसत. हिमालय पाहतांच भारताची त्यागतपस्या आठवते. भारताचें अध्यात्मिक जीवन डोळ्यांसमोर येतें. आणि चित्तरंजन प्रभुप्रेमांत डुंबूं लागले. वैष्णवधर्माचीं गीतें आळवूं लागले. त्यांचें हृदय प्रभुमय होतें. पुनः पुन्हां त्यांचें मन वृंदावनांत जाऊं इच्छी. गंगातटाकीं झोंपडी बांधून राहूं इच्छी.

## झोंपडींत मलाहि जागा ठेवा

पुण्याच्या ससून हॉस्पिटलांत शस्त्रक्रिया होऊन महात्माजी खाटेवर पडून होते. देशबंधु त्यांना भेटायला आले होते. बोलतां बोलतां देशबंधु म्हणाले, " महात्माजी, नको हा खटाटोप असें वाटतें. गंगातटाकीं झोंपडी बांधावी व प्रभूचें स्मरण करीत रहावें असें सारखें मनांत येतें. "

" त्या झोंपडींत माझ्यासाठींहि थोडी जागा ठेवा " महात्माजी म्हणाले.

दार्जिलिंगला ही वृत्ति पुन्हां बळावली. तरी देशांतील कामाकडे डोळे होतेच. बंगालचीं खेडीं पुन्हां पूर्वीप्रमाणें भरल्या गोकुळासारखीं कशीं होतील याची त्यांना हुरहुर लागली होती. ते योजना करीत होते. आणि त्यांना भेटायला महात्माजी आले. स्वर्गीय महादेवभाईहि होतेच. तो लहानसा बंगला गजबजून गेला. महात्माजींची सारी नीट व्यवस्था राहावी म्हणून देशबंधूंची किती उत्कंठा ! बकरीचें दूध हवें म्हणून पलीकडच्या तिबेटी भागांतून पांच बकऱ्या आणण्यांत आल्या. केव्हां उजाडतें व महात्माजी आपलें प्रसन्न मुक्त हास्य घेऊन येतात असें देशबंधूंस होई. देशबंधु आपल्या खाटेवर महात्माजींना बसवीत. तेथें लोड करीत. त्याला महात्माजी टेकत. आणि मग विनोद चाले.

" सूत काढायला आतां पुन्हां सुरुवात केली आहे. चरखाहि शिकेन " देशबंधु म्हणत.

" परंतु चरख्याची माळ कशी घालावी, चाक कशी बसवावी हें समजत असेल तर शपथ. सारें मी करून देईन तेव्हां " वासंतीदेवी हसून म्हणत.

" तुम्ही स्वतःचें महत्त्व वाढावें म्हणून देशबंधूंना परावलंबी करून ठेवलें आहे " महात्माजी म्हणत.

" महात्माजी, खरोखरच यांना हें कांहीं येत नाहीं. ट्रंकेचें कुलूप कसें काढावें, बॅग कशी उघडावी तेंसुद्धां समजत नाहीं ! विचारा मी खोटें बोलत असेन तर. "

" यावरून माझा आरोप अधिकच सिद्ध होत आहे. तुमची

पदोपदीं जरूर वाटावी म्हणून देशबंधूंना तुम्हीं असें अज्ञानांत ठेवलें," असें म्हणून महात्माजी हसत. सारी मंडळी हसूं लागे. निर्मळ आनंदसागर तेथें उचंबळे.

"महात्माजी, चरख्याला आतां मी सोडणार नाहीं. हा चरखा घरोघर गेला पाहिजे. चरख्यानें पुन्हां खेडीं सजीव होतील. मी सतीशबाबूंना बोलावून घेतों. आपण खादीची सर्व योजना आंखूं. बंगालभर खादी कशी फैलावेल तें ठरवूं."

"परंतु या बंगल्यांत आतां आणखी माणसें आलीं तर राहणार तरी कोठें?" महात्माजी म्हणाले.

"राहतील येथेंच" देशबंधु म्हणाले.

आणि सतीशबाबू आले. खालच्या मजल्यावर खादीची चर्चा सुरू झाली. सतीशबाबूंना थंडी वाजत होती. देशबंधु एकदम उठले व जिना चढून वर गेले. तेथला गरम कोट घेऊन ते निघाले.

"मी नेऊं का?" महादेवभाईनीं विचारलें.

"मीच नेतों" देशबंधु म्हणाले.

आणि सतीशबाबूंना तो कोट त्यांनीं दिला. रात्रीं स्वतः खालीं निजून सतीशबाबूंना त्यांनीं आपली खाट दिली. कारण सतीशबाबूंना पडसें झालें होतें. जरा ताप आला होता. देशबंधु स्वतः आजारी, परंतु दुसऱ्यासाठीं त्यांना किती काळजी!

### "देशबंधूंची अध्यात्मिकता पाहिली"

देशबंधूंना बरें वाटत आहे असें महात्माजींना वाटलें. ते बंगालच्या दौऱ्यावर पुन्हां निघाले. महात्माजींनीं या भेटीचें वर्णन कर-

तांना लिहिलें, " या दोन दिवसांत मी देशबंधूंच्या अधिक जवळ गेलों. त्यांची अध्यात्मिकता मी पाहिली. देशबंधूंना मी यथार्थपणें जाणलें. "

## रामनामाची किती सुंदर प्रथा

मरणापूर्वी चार दिवस ते एकदां म्हणाले, " मरतांना रामनाम म्हणत मरावें ही प्रथा किती सुंदर आहे. रोग, दुःख, शोक, चिंता सारें दूर करण्याची, सर्वांचा विसर पाडण्याची शक्ति या रामनामांत आहे. प्रभूच्या नामसंकीर्तनांत जशी ही शक्ति आहे, तशी कशांतहि नाहीं. "

एके दिवशीं म्हणाले, " कित्येक वर्षांपूर्वी एक वृद्ध वैष्णव मीं पाहिला होता. " यादवाय माधवाय गोविंदाय नमोनमः " हे शब्द तो वृद्ध कसे पण उच्चारी ! ते शब्द माझ्या कानांत घुमत आहेत. तसा मस्त करणारा ध्वनि मीं पुन्हां कधीं ऐकला नाहीं. "

## तुझ्या दारांत येऊं दे

देशबंधु आतां मरणाच्याच गोष्टी बोलत. त्यांना का मरण दिसत होतें ? त्यांचा सर्वांत धाकटा भाऊ वसंतरंजन येथेंच मरण पावला होता. त्या भावाची ते सारखी आठवण काढीत. तो मला दिसतो असें म्हणत. तो हांका मारीत आहे असें म्हणत. जसजसें मरण जवळ येत होतें, तसतसा नामसंकीर्तनाचा नाद वाढला. चंडीदासांचीं गाणीं ते गात. समोर हिमालयाकडे बघत. त्यांची दृष्टि अनंतांत बघत आहे असें वाटे.

आणि एके दिवशीं त्यांनीं तें भक्तिप्रेममय गाणें केलें. त्या गाण्यांत कोणता भाव होता, कोणते विचार होते ?

" पुस्तकांचें ओझें डोक्यावरून उतरा आतां. ज्ञान व अभिमान यांचें गांठोडें माझ्या डोक्यावरून उतरा आतां. हा बोजा डोक्यावर घेऊन घेऊन माझें डोकें दुखूं लागलें आहे. सारें शरीर जीर्णशीर्ण झालें आहे. धांपा टाकून हृदय थकून गेलें आहे. डोळ्यांसमोर अंधार आहे. मला आतां एकच इच्छा आहे. डोक्यावर मोरमुकुट घातलेला, हातांत बांसरी असलेला असा तो राधेचा आत्माराम, तो गोपाळकृष्ण, त्याला पाहण्यासाठीं माझे प्राण अधीर झाले आहेत, तहानले आहेत. वेद व वेदान्त आतां विसरून जाऊं दे. प्रभो, तुझें राज्य समोर दिसत आहे. तुझ्या त्या आवडत्या कुंजद्वारांत मी येत आहें. माझा विझणारा दिवा पुन्हां पेटवण्यासाठीं तुझ्या मंगल धामीं मी येत आहें. "

असें हें अंतिम गान देशबंधूंनीं आळविलें. ही त्यांची शेवटची कविता. जीवनाच्या महाकाव्यांतील हें शेवटचें प्रभुसमर्पणाचें गीत. देवाचें राज्य त्यांना दिसूं लागलें.

परंतु जवळच्या मंडळींस वाटत होतें कीं देशबंधूंची प्रकृति सुधारत आहे. दोन महिने बहिणी जवळ होत्या. परंतु प्रकृति बरी आहे असें पाहून त्या कलकत्त्यास गेल्या. देशबंधु थोडथोडें चालत. एका रिक्षाला वर काढण्यासाठीं त्यांनीं मदताहि केली. तोंडावर तजेला दिसूं लागला. परंतु हें सारें फसवणारें होतें. आणि एके दिवशीं तो ताप पुन्हां आला. प्राण घेणारा ताप ! २० वर्षांपूर्वी

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.



मेलेल्या बंधूचें त्या दिवशीं ते स्मरण करीत होते. स्वतःच्या अध्यात्मिक गुरूचें स्मरण करीत होते. गुरूनें दिलेल्या मंत्राचें स्मरण करीत होते. मध्येच चंडीदासाचीं गीतें म्हणत. चंडीदास व विद्यापति या दोन कवींची त्यांनीं तुलना केली. चंडीदासाच्या गीतांतील प्रेम अतिमानुष आहे, अपार्थिव आहे असें ते म्हणाले.

## १९२५ जूनची १६ तारीख

सोमवारीं अशी स्थिति होती. आणि मंगळवार उजाडला. १९२५ जूनची १६ वी तारीख. हळूहळू मंत्रोच्चारण, रामनाम बंद होत चाललें. शरीर थंड होत चाललें. वाणी बंद झाली. सारे घाबरले. कलकत्त्यास तारा गेल्या. परंतु त्या दिवशीं सायंकाळीं पांच वाजतां सारें संपलें. तें महान् जीवन अनंतांत बुडून गेलें. हिमालयाच्या महान् शांतींत देशबंधूंच्या जीवनाचें करुणगंभीर सागरसंगीत, मधुर उत्कट सागरसंगीत, विलीन झालें.

## तपस्विनी वासंतीदेवी

दार्जिलिंगहून तो पवित्र देह कलकत्त्यास न्यावयाचा होता. वासंतीदेवी दुःख गिळून गंभीर झाल्या होत्या. दार्जिलिंग सोडतांना मुलेंबाळें जवळ घेऊन त्यांनीं पुढील प्रार्थना म्हटली.

> " तुमि बंधु, तुमि नाथ, निशिदिन तुमि आमार
> तुमि सुख, तुमि शान्ति, तुमि हे अमृत पाथार
> तुमि तो आनन्दलोक, जुडाओ प्राण, नाशो शोक
> तापहरण तोमार चरण असीम शरण दीन जनार "

[ हे प्रभो, तूंच बंधु, तूंच नाथ, रात्रंदिवस तूं आमचा आहेस.

तूं सुख; तूं शांति; तूंच अमृतधारा; तूं आनंदाचा ठेवा; माझा शोक दूर कर; नवजीवन दे; ताप हरण करणारे तुझेच चरण; गरीब जनांचा तूंच एक थोर आधार. ]

अशी प्रार्थना म्हणून नंतर शव उचलण्यांत आलें.

## अपूर्व प्रतयात्रा

आणि पवित्र देह कलकत्त्यांत आला. लाखों लोकांची गर्दी होती. देशबंधूंच्या बंधूंनीं भजनी मेळे बोलावले होते. ' हरि बोल हरि बोल ' हें भजन गगनास जाऊन भिडलें. आणि महात्माजी कलकत्त्यास येऊन पोंचले. शवाला त्यांनीं खांदा दिला. कलकत्त्यास सकाळीं ७।। वाजतां मिरवणूक सुरू झाली. ती स्मशानांत पोंचायला ३।। वाजले. स्मशानघाटावर माणसें मावत नव्हतीं. जनतासागर उसळला होता. लोक पुढें मागें लाटांप्रमाणें हेलावत होते. आणि त्या पवित्र देहाला अग्निसंस्कार देण्यांत आला. ज्वाळा दिसतांच लोकांचा धीर सुटला. महात्माजींना खांद्यावर घेऊन उंच करण्यांत आलें. ते लोकांना म्हणाले, " काम संपलें. आतां घरोघर जा. " आणि खांद्यावरूनच महात्माजी निघाले. माझ्या पाठोपाठ या, चला, असें महात्माजी शब्दांनीं व खुणांनीं सांगत होते. त्याचा परिणाम झाला. हजारों लोक माघारे वळले. महात्माजींनीं लिहिलें, " मीं जर क्षणभर उशीर केला असता तर शेंकडों लोकांनीं त्या चितेंत उड्या घेतल्या असत्या. "

## मूर्तिमंत यज्ञ

देशबंधूंची निधनवार्ता वाचून सारें राष्ट्र शोकसागरांत बुडालें. अनेकांनीं गुणवर्णनपर लेख लिहिले. सर्वत्र शोकसभा झाल्या. परंतु या भव्य-दिव्य जीवनाचें शब्दांनीं थोडेंच वर्णन करतां येणार ? कवि-सम्राट् रवीन्द्रनाथ म्हणाले :

" देशबंधु मूर्तिमंत यज्ञ होते. "

सेवादलांतील माझ्या मित्रांनो, हा महान् आदर्श डोळ्यांसमोर ठेवा. किती त्याग, कशी धीरोदात्तता; किती औदार्य, किती प्रेमळ-पणा; कसा निश्चय, कशी इच्छाशक्ति; किती कष्ट करीत, कसे दुसऱ्यासाठीं धावून येत ! अशी देशभक्ति कोठें पहावी, कोठें शोधावी ? तुम्ही असे ध्येयवादी बनण्याची खटपट करा. देशाचें स्मरण ठेवा. सर्वांचें ऐक्य करा. आणि स्वातंत्र्य मिळवून सर्व बंधूंचे संसार सुखाचे करण्यासाठीं झटा.

वन्दे मातरम्

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ३३८२ नों. दि. ७।१०।७१
अनुक्रम २८८८
विभाग
क्रमांक
नों. दि. ३१।३।६७
वाचनालय शाखा
IRBK-0103392